
# खालापूर हादरले! वृद्ध दाम्पत्याची गळा चिरून हत्या



**खालापूर** : तालुक्यातील निंगडोळी गावात रघुनाथ दत्तू फराट (वय ७०) आणि त्यांच्या पत्नीची गळा चिरून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही हत्या शंभर घरांची वस्ती असणाऱ्या मध्यवर्ती गावात मंगळवारी (दि.२६) सायंकाळच्या सुमारास घडली. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. हत्या जमिनीच्या वादातून झाली असावी, असा प्राथमिक अंदाज असून पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत सर्व बाजूंनी माहिती घेण्यास सुरुवात केली आहे. रघुनाथ फराट हे रायगड जिल्हा बँकेत सेवेत होते. सात वर्षांपूर्वी ते सेवेतून निवृत्त झाले. नंतर त्यांनी शेती तसेच सामाजिक कार्यात स्वतःला सामावून घेतले होते. शांत, सुस्वभावी व मनमिळावू रघुनाथ फराट यांची आणि त्यांच्या पत्नीची नेमकी कोणत्या कारणाने हत्या झाली आणि आरोपी कोण याचा तपास खालापूर पोलीस करीत आहेत.

रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३०८
www.ramprahar.com
◆ बुधवार, २७ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

सिडको क्षेत्रात उद्यापासून १० टक्के पाणीकपात/२
तळा तालुक्यात अवैध जांभा दगडाच्या खाणी सील/५
निशेष बसवरेड्डीला वाइल्ड कार्ड एण्ट्री/८

### राज्यात पेट्रोल-डिझेलची कृत्रिम टंचाई करणाऱ्यांना बसणार चाप!

# साठेबाजांवर कारवाई करणार : मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्यात गेल्या काही दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या मागणीत सरासरीपेक्षा लक्षणीयरित्या मोठी वाढ झाली आहे. या वाढीव मागणीचा पुरवठा केला जात असतानाही राज्यात कृत्रिम टंचाईसदृश स्थिती निर्माण केली जात असल्याचे समोर आले आहे. "शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्यांच्या गरजेचा गैरफायदा घेऊन इंधनाची साठेबाजी करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. अशा साठेबाजांवर नागरी पुरवठा आणि गृहविभागाकडून संयुक्तपणे कडक कारवाई केली जाईल," असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि.२६) स्पष्ट केले.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेही उपस्थित होते. राज्यातील इंधनाच्या पुरवठ्याची आकडेवारी जाहीर करताना मुख्यमंत्री म्हणाले की, सध्या राज्यात पेट्रोलच्या मागणीत सरासरीपेक्षा २३ टक्के, तर डिझेलच्या मागणीत तब्बल ५२ टक्के वाढ झाली असून सरकारकडून त्याचा पुरवठाही केला जात आहे, मात्र काही जिल्ह्यांमध्ये ही वाढ संशयास्पद आहे.

अकोला जिल्ह्यात इंधनाचा खप १५४ टक्क्यांनी वाढला आहे, तर छत्रपती संभाजीनगर, बीड, भंडारा, बुलढाणा, गोंदिया आणि हिंगोली या भागांत ७० टक्क्यांहून अधिक खपत झाली आहे. दुसरीकडे व्यावसायिक (कमर्शियल) पेट्रोल-डिझेलचा खप मात्र कमी होताना दिसत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी असणारे इंधन व्यावसायिक ठिकाणी वळवून काळाबाजार किंवा साठेबाजी केली जात आहे का याची सखोल पडताळणी करण्याचे आदेश गृह विभागाला देण्यात आले आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. घाबरून इंधन खरेदी करू नये, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

### कांदाप्रश्नी विरोधकांचे अश्रू पुतना मावशीचे!

नाशिकच्या चांदवड येथे विरोधकांकडून कांदा प्रश्नावर सुरू असलेल्या आंदोलनाचा मुख्यमंत्र्यांनी समाचार घेतला. ते म्हणाले, महाविकास आघाडीने केलेले हे राजकीय आंदोलन आहे. कांदा कापल्यानंतरही ज्यांच्या डोळ्यांत अश्रू येणार नाहीत अशी मंडळी आज शेतकऱ्यांसाठी पुतना मावशीचे अश्रू ढाळत आहेत, पण महायुती सरकार शेतकऱ्यांबाबत अत्यंत संवेदनशील आहे. केंद्र सरकारने कालच कांदा खरेदीचा भाव साडेतीन रुपयांनी वाढवून तो १५ रुपयांपर्यंत केला असून मोठ्या प्रमाणावर खरेदी सुरू केली आहे. विरोधकांनी त्यांच्या काळात कधी एवढ्या भावाने खरेदी केली होती का ते दाखवावे. केवळ १५ रुपयांवर न थांबता यावर दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी आम्ही केंद्र सरकारला बैठक घेण्याची विनंती केली होती. त्यानुसार बुधवारी सायंकाळी दिल्लीत महत्त्वाची बैठक होणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

# राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना जनगणनेमुळे मुदतवाढ

### मंत्रिमंडळ बैठकीत विविध महत्त्वपूर्ण निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि.२६) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत गृह, परिवहन, सामान्य प्रशासन आणि उद्योग विभागाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. यामध्ये देशात सुरू असलेल्या जनगणनेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या सन २०२६मधील सर्वसाधारण बदल्यांच्या प्रक्रियेला मंत्रिमंडळाने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या दरवर्षी एप्रिल-मे महिन्यात करण्यात येतात, मात्र देशात जनगणना २०२७ अंतर्गत पहिला टप्पा सुरू आहे. त्यामध्ये घरयादी तयार करणे व घरगणना हे काम १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे. जनगणनेच्या कामासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात येऊ नये, असे निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत. त्यामुळे या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांना ३० जूनपर्यंत मुदतवाढ द्यावी लागणार आहे. त्यानुसार बदलीसंदर्भातील अधिनियमात मुदतवाढीबाबत सुधारणा करावी लागणार आहे. त्यानुसार या मुदतवाढीबाबतचा अध्यादेश राज्यपालांच्या मान्यतेने जाहीर करण्यास मान्यता देण्यात आली.

डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील मौजे सागाव-सोनारपाडा (ता. कल्याण, जि. ठाणे) येथील पिंपळेश्वर देवस्थान मंदिर ट्रस्टला मोठा दिलासा मिळाला. या मंदिराच्या ताब्यात असलेली चार एकर २५ गुंठे जमीन ट्रस्टला देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. जमिनीवरील मंदिर ट्रस्टचा सद्यस्थितीतील वापर अधिकृतरीत्या नियमित करण्यात येणार असून ही जमीन ट्रस्टला नाममात्र दरात देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय उद्योग विभागाने घेतला आहे.

नवीन नागपूर व नवीन बाह्यवळण रस्ता प्रकल्पाच्या उभारणीला गती देण्यासाठी महसूल विभागाने मोठा निर्णय घेतला. या प्रकल्पासाठी नागपूर जिल्ह्याच्या हिंगणा तालुक्यातील मौजे गोदणी आणि मौजे लाडगाव (रीठी) येथील खासगी जमीन जमीन मालकांशी वाटाघाटी करून थेट खरेदी केली जाणार आहे. या थेट खरेदीच्या व्यवहारांवर आकारले जाणारे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क पूर्णपणे माफ करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यामुळे या महत्त्वाकांक्षी रस्ता प्रकल्पाच्या भूसंपादनाचा मार्ग सुकर होणार आहे.

## मुंबईत ड्रग्ज फॅक्टरी उद्ध्वस्त! ५०.७४ कोटींचा साठा जप्त

### तीन जणांना अटक

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई पोलिसांनी आग्रीपाडा परिसरात सापळा रचून एका राहत्या घरात सुरू असलेली ड्रग्ज निर्मिती फॅक्टरी उद्ध्वस्त केली. या ठिकाणाहून जवळपास ५०.७४ कोटींचा मेफेड्रॉनचा साठा जप्त करण्यात आला असून तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्या आदेशानुसार शहर आणि उपनगरात अमली पदार्थांची तस्करी, विक्री आणि निर्मिती करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत अमली पदार्थविरोधी कक्षाच्या कांदिवली युनिटला गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी आग्रीपाडा परिसरात सापळा रचून एका राहत्या घरात सुरू असलेली ड्रग्ज निर्मिती प्रयोगशाळा उद्ध्वस्त केली.

या कारवाईत तब्बल १४ किलो ४९३ ग्रॅम मेफेड्रॉन आणि लिक्विड एमडीसह एकूण ५० कोटी ७४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याशिवाय ड्रग्ज तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी रसायने, कच्चा माल, उपकरणे आणि इतर साहित्यही जप्त करण्यात आले. तपासादरम्यान आरोपींकडून एक देशी बनावटीचे पिस्तूल आणि १९ जिवंत काडतुसेही मिळून आली. तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

## ग्रामीण भागात गॅस सिलिंडरची घरपोच सेवा पूर्ववत

**पुणे** : आखाती देशांमध्ये युद्ध सुरू झाल्यानंतर विशेषतः ग्रामीण भागांत गॅसच्या तुटवड्यामुळे भारत गॅसने अनेक ठिकाणी घरपोस सिलिंडरची सुविधा थांबवली होती. आता ही सुविधा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. आखाती देशांमध्ये युद्ध सुरू झाल्यानंतर गॅस सिलिंडरच्या मागणीत अचानक मोठी वाढ झाली. त्यामुळे नागरिकांनी घाबरून खरेदी करण्यास सुरुवात केली. परिणामी गॅस कंपन्यांनी अनेक भागांमध्ये घरपोच सिलिंडरचे वितरण बंद केले होते. ही सेवा पुन्हा सुरू झाली आहे.

## सावंतवाडी रेल्वेस्थानकाला स्व. मधु दंडवते यांचे नाव



कोकण रेल्वेचे शिल्पकार आणि देशाचे माजी रेल्वेमंत्री स्व. मधु दंडवते यांचे नाव सावंतवाडी रेल्वेस्थानकाला देण्याच्या प्रस्तावाला मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या निर्णयानुसार आता सावंतवाडी रेल्वेस्थानकाचे नाव 'लोकमान्य मधु दंडवते रेल्वे टर्मिनस' असे होणार असून यामुळे कोकणातील जनतेची अनेक वर्षांची मागणी अखेर मार्गी लागली आहे.

नामकरणाबाबतचा हा अंतिम प्रस्ताव मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

## निवडक

### सामूहिक विवाहाच्या नावाखाली फसवणूक; दाम्पत्य गजाआड

**देवास** : अनाथाश्रमातील मुलींशी लग्न लावून देण्याच्या बहाण्याने एका टोळीने ४२ तरुणांची सामूहिक विवाहाच्या नावाखाली फसवणूक केल्याचा प्रकार मध्य प्रदेशातील देवासमध्ये उघडकीस आला आहे. यासाठी नवरदेवाच्या मोबाइलवर मुलींचे फोटो पाठवून प्रत्येकाकडून नोंदणी शुल्क म्हणून १५ हजार ते २५ हजार रुपये उकळण्यात आले होते, मात्र लग्नमंडपात वधू आल्याच नाहीत. याप्रकरणी पोलिसांनी या रॅकेटचा मुख्य सूत्रधार मुकेश आणि त्याच्या पत्नीला अटक केली आहे. आरोपी मूळचे विदिशा जिल्ह्यातील रहिवासी असून अधिक तपास सुरू आहे.

### देशातील डेमोग्राफिक बदलांवर हाय लेव्हल कमिटीची स्थापना

**नवी दिल्ली** : देशातील डेमोग्राफिक (लोकसंख्याशास्त्रीय) बदलांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृह मंत्रालयाने एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. या संदर्भात बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, ही समिती अवैध स्थलांतर आणि इतर असामान्य कारणांमुळे संपूर्ण भारतात होणाऱ्या डेमोग्राफिक बदलांचे मूल्यांकन करेल. घुसखोरीमुळे होणारा हा असामान्य बदल राष्ट्राच्या वर्तमान व भविष्यासाठीही मोठे आव्हान आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०२५ रोजी केलेल्या घोषणेनुसार या समितीची स्थापना करण्यात आली आहे.

# 'भरारी २०२६' : गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि करिअर मार्गदर्शन शिबिर

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेला "भरारी २०२६" : गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ व करिअर मार्गदर्शन शिबिर पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मोठ्या उत्साहात झाले. पनवेल परिसरातील ५३ शाळांमधील १२० गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करत त्यांना पुढील शिक्षण व करिअरसाठी प्रेरणा देण्यात आली.

या कार्यक्रमात जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या संघर्षमय जीवन प्रवासातील अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवत समाजात कसे वेगळे स्थान निर्माण केले याबद्दलची माहिती देत त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रेरित केले. मेहनत, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या जोरावर यश मिळविता येते, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला तसेच त्यांच्या पुढील शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, नगरसेवक परेश ठाकूर, रवींद्र जोशी, माजी नगरसेवक अनिल भगत, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एमकेसीएल, पुणे)चे महाव्यवस्थापक नटराज कटकधोंड, कोकण विभाग मेंटॉर जयंत भगत, समन्वयक मंगेश जाधव, रायगड जिल्हा समन्वयक सिद्धेश गोसावी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमास विद्यार्थ्यांसह पालक आणि विविध शाळांचे मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरात प्रसिद्ध करिअर मार्गदर्शक, लेखक व व्याख्याते प्रा. विजय नवले यांनी "इयत्ता दहावी व बारावीनंतरचे एआय युगातील करिअर्स" या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात एआय, डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी, डिजिटल मार्केटिंग, ॲनिमेशन, गेम डेव्हलपमेंट तसेच विविध आधुनिक क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या करिअर संधींबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणासोबत कौशल्य विकासावर भर देत भविष्यातील स्पर्धेसाठी स्वतःला तयार ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले. **(पान २ वर..)**

# मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी २६० कोटींच्या कृती आराखड्यास मंजुरी

**मुंबई : प्रतिनिधी**

मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी राज्यात पहिल्या टप्प्यात १० ठिकाणी नियंत्रण कक्ष उभारणे, राज्यातील एक हजार गावांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित अलर्ट यंत्रणा उभारणे तसेच दोन रेस्क्यू सेंटर आणि १० उपचार केंद्रे उभारण्यास राज्य वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीच्या बैठकीत अध्यक्ष तथा वनमंत्री गणेश नाईक यांनी मंजुरी दिली. हा प्रकल्प सुमारे २६० कोटी रुपयांचा असून मानवांवरील वन्यजीवांचे हल्ले रोखण्यासाठी तातडीने या उपाययोजना राबविण्याचे निर्देश त्यांनी दिले.

राज्य वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीची बैठक मंत्रालयात वनमंत्री नाईक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी आमदार समीर मेघे, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) एम. श्रीनिवास रेड्डी, उपसचिव निकिता पांडे यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.

मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्यासाठी आणि मानवी जीवितहानी होऊ नये यासाठी वन विभागाच्या वतीने कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्यांतर्गत पोलीस नियंत्रण कक्षाच्या धर्तीवर राज्यातील विविध भागांत १० नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येणार आहेत. **(पान २ वर..)**



## नवी मुंबईत फ्लेमिंगोंची गुलाबी चादर



**नवी मुंबई :** येथील खाडीकिनारी भागात रोहित पक्षी अर्थात फ्लेमिंगोंचे मोठ्या प्रमाणात आगमन झाले आहे. त्यामुळे गुलाबी रंगाची जणू चादर पसरल्याचे दृश्य पाहायला मिळत आहे. त्यांना पाहण्यासाठी आणि कॅमेऱ्यात साठवण्यासाठी पक्षीप्रेमी, छायाचित्रकार आणि निसर्गप्रेमी मोठ्या संख्येने खाडीकिनारी गर्दी करीत आहेत. (छाया : सुधीर नाझरे)

# आंबेनळी घाटातील रेस्क्यू ऑपरेशन संपले!

### कठीण मोहिमेद्वारे मृतदेह काढले बाहेर

**पोलादपूर : रामप्रहर वृत्त**

महाबळेश्वर-पोलादपूर मार्गावरील आंबेनळी घाटात रविवारी स्कॉर्पिओ जीप सुमारे हजार फूट खोल दरीत कोसळून आठ जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर बचावकार्य तब्बल २२ तास सुरू होते. अखेर सोमवारी रात्री ८ वाजता शेवटचा मृतदेह दरीतून बाहेर काढण्यात आला आणि ऑपरेशन पूर्ण झाले.

या कठीण रेस्क्यू मोहिमेदरम्यान बचाव पथकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. महाबळेश्वर ट्रेकर्स, प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीम आणि महाड येथील सिस्केप टीम यांनी संयुक्तपणे हे बचावकार्य पार पाडले.

आंबेनळी घाटात गाडी दरीत कोसळल्याचा संदेश महाबळेश्वर ट्रेकर्सना रविवारी रात्री पावणेदहा वाजता मिळाला. त्यानंतर प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीमचे सदस्य घटनास्थळाकडे रवाना झाले. महाडची सिस्केप टीमही मदतीसाठी घटनास्थळी दाखल झाली. अपघाताचे ठिकाण निश्चित झाल्यानंतर ट्रेकर्स दरीत उतरले. सुरुवातीला त्यांना दोन मृतदेह दिसून आले. त्यानंतर काही सदस्यांनी दाभिळ गावाच्या बाजूने शोधमोहीम सुरू केली. ज्या ठिकाणी गाडी कोसळली होती, त्या परिसरात सर्व मृतदेह अस्ताव्यस्त अवस्थेत आढळून आले.

यादरम्यान झाडांवरील मधमाश्यांची पोळी आणि निसरडी वाट यामुळे बचावकार्याला मोठा अडथळा निर्माण झाला. तरीही प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत शोधमोहीम सुरू ठेवण्यात आली. सलग २२ तासांच्या अथक प्रयत्नानंतर सर्व आठ मृतदेह दरीतून वर काढण्यात आले.

# ८९ हजार कोटींच्या गुंतवणुकीला मिळणार चालना; पाच अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन



**मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रात औद्योगिक गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि आधुनिक औद्योगिक परिसंस्था विकसित करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योग विभाग मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत सुमारे ८९ हजार ७३१ कोटी रुपयांच्या पाच विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला. या प्रकल्पांमुळे राज्यात अंदाजे २० हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असून विदर्भ, मराठवाडा, नाशिकसह राज्यातील विविध भागांमध्ये औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राज्याच्या औद्योगिक धोरणानुसार सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत उद्योगांना विविध सवलती व प्रोत्साहने देण्यात येतात. त्या अंतर्गत नवीन उद्योग स्थापन होऊन मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित व्हावी, रोजगार वाढावा आणि औद्योगिक परिसंस्था निर्माण व्हावी, यासाठी विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष सवलती देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. या उपसमितीची बैठक मंत्रालयात पार पडली. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासु यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत कोल गॅसिफिकेशन ॲण्ड डाऊनस्ट्रीम डेरीव्हेटिव्हज, सोलर सेल मॉड्युल, इग्नॉट, वेफर्स पॅनेल, इलेक्ट्रिक स्टील, पेट टायर कॉर्ड तसेच सिंथेटिक ग्रॅफाइट ॲनोड मटेरियल यांसारख्या उच्च तंत्रज्ञानाधारित आणि भविष्यकालीन उद्योग क्षेत्रांतील पाच प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्यास मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्यता दिली. या सर्व प्रकल्पांमुळे राज्यात उच्च तंत्रज्ञानाधारित उत्पादन क्षेत्राचा विस्तार होण्यास मदत होणार आहे.

या विशाल प्रकल्पांमुळे केवळ गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीच वाढणार नाही, तर स्थानिक स्तरावर व्यावसायिक उपक्रम, पूरक उद्योग आणि पुरवठा साखळीही विकसित होणार आहे. तांत्रिक नवकल्पना, संशोधन व विकासाला चालना मिळून लघु व मध्यम उद्योगांना नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच स्थानिक युवकांसाठी प्रशिक्षण व कौशल्य विकासाच्या संधी निर्माण होऊन उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रातील रोजगार क्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

## फिश वेंडिंग ई-रिक्षा योजनेमुळे मत्स्यविक्रीला नवे बळ; स्वच्छ व आधुनिक बाजारपेठ उपलब्ध होणार!

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील मत्स्यविक्री व्यवसाय अधिक स्वच्छ, आधुनिक आणि ग्राहकाभिमुख करण्याच्या दृष्टीने मत्स्यव्यवसाय विभागामार्फत "फिश वेंडिंग ई-रिक्षा" मॉडेल राबविण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव सादर करावा, या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना अनुदान देण्याबाबत शासन स्तरावर सकारात्मक विचार सुरू असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी आज येथे दिली.

मंत्रालयात मत्स्यव्यवसाय विभागाच्या फिश वेंडिंग स्टॉल योजने अंतर्गत लाभार्थ्यांना ९०टक्के अनुदान देणेबाबत व ई- रिक्षा आधारीत मॉडेल राबविण्यासंदर्भात आयोजित बैठकीत श्री राणे बोलत होते. यावेळी आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर, मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचे प्रतिनिधी आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

श्री राणे म्हणाले की, अमरावती जिल्ह्यात सध्या ८० नोंदणीकृत मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था कार्यरत असून, त्यामधील अंदाजे ५०० ते ७०० सक्रिय सभासद किरकोळ मासळी विक्री व्यवसायाशी जोडलेले आहेत. मात्र, जिल्ह्यातील बहुतांश मत्स्यविक्री बाजारपेठा अस्वच्छ आणि अपुऱ्या सुविधांनी ग्रस्त आहेत. यामुळे मासळीच्या गुणवत्तेवर परिणाम होत असून मच्छीमारांना योग्य बाजारभाव मिळण्यात अडचणी येत आहेत.याच पार्श्वभूमीवर मत्स्यव्यवसाय विभागाने "फिश वेंडिंग ई-रिक्षा" हे आधुनिक मॉडेल राबविण्याचा प्रस्ताव सादर करावा. विभागामार्फत आणि जिल्हा वार्षिक योजनेतून मदत देण्याचा प्रयत्न केला जाईल.या योजनेसाठी प्रति लाभार्थी अंदाजे चार लाख रुपयांचा प्रकल्प खर्च प्रस्तावित करण्यात आला आहे.



## पेणचे बाप्पा निघाले परदेशी! चार लाख गणेशमूर्ती होताहेत मार्गस्थ

**पेण : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील पेण मधील गणेशमूर्तींची दरवर्षी मार्च आणि एप्रिल महिन्यात सुरू होणारी निर्यात यंदा आखाती देशांमधील युद्धस्थितीमुळे काही काळ रेंगाळली होती, मात्र आता मुंबईच्या जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी (जेएमपीए) बंदरातील वाहतूक कोंडी सुटल्याने बाप्पाच्या मूर्ती विविध देशांकडे मार्गस्थ होत आहेत. मे महिन्याच्या अखेरपर्यंत सुमारे चार ते साडेचार लाख गणेशमूर्ती परदेशात सुखरूप पोहोचतील, असा विश्वास पेणमधील गणेशमुर्तीकारांनी व्यक्त केला आहे.

पेण तालुक्यात सद्यस्थितीत ५०० पेक्षा अधीक गणेशमूर्ती कार्यशाळा कार्यरत असून, येथे प्रतिवर्षी एकूण १५ ते १६ लाख गणेशमूर्ती तयार केल्या जातात. या अवाढव्य गणेशोत्सव व्यवसायातून पेण तालुक्यात प्रतिवर्षी सुमारे १०० कोटी रुपयांची प्रचंड आर्थिक उलाढाल होते. या व्यवसायावर स्थानिक अर्थव्यवस्था, मूर्तीकार आणि हजारो कारागिरांचे कुटुंब अवलंबून आहे.

एकूण उत्पादनापैकी दरवर्षी ४ लाख गणेशमूर्ती परदेशात निर्यात केल्या जातात. या मूर्ती कच्च्या माती आणि शाडू मातीपासून



बनवलेल्या (पर्यावरणपूरक) असतात. अमेरिका, जपान, थायलंड, रशिया, मलेशिया, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका आणि भूतान या देशांमध्ये या पारंपरिक आणि सुबक मात्र केवळ पर्यावरणस्नेही मूर्तींनाच परवानगी असते. उर्वरित ११ ते १२ लाख मूर्ती या प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) पासून तयार केल्या जातात, ज्या देशांतर्गत बाजारपेठेसाठी आणि इतर राज्यांत पाठवल्या जातात.

गेल्या दोन महिन्यांपासून आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे जेएनपीए बंदरावर मोठा ताण आला होता. कंटेनर निर्यात बंद होती. याच बंदरातून कांदे, द्राक्षे, केळी, आंबे, तांदूळ आणि गहू यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंची मोठ्या प्रमाणावर निर्यात होते. या मालाची वाहतूक आखाती देशांच्या मार्गाने होत असल्याने बंदरामध्ये जहाजांची आणि कंटेनर्सची प्रचंड कोंडी (ट्रॅफिक जाम) झाली होती. याचा थेट फटका गणेशमूर्तींच्या निर्यातीला बसला. युद्धस्थिती थोडी शिथिल झाल्यानंतर, गणपतीमुर्तींचे कंटेनर स्विकारण्यास प्रारंभ झाला आणि महिन्याभराच्या विलंबाने बाप्पाच्या मूर्तींसाठी जेएनपीएचे मार्ग खुले झाले. मार्च-एप्रिलची ही नेहमीची वेळ हुकल्यामुळे आता मे अखेरपर्यंत मूर्ती पाठवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

परदेशात जाणाऱ्या गणेशमूर्तींची निर्मिती पेणमधील कार्यशाळांमध्ये जवळपास पूर्ण झाली आहे. समुद्रमार्गे प्रवास करताना मूर्तींना कोणताही धक्का लागू नये, यासाठी विशेष काळजी घेतली जात आहे. पुठ्ठ्यांचे बॉक्स, कागद आणि कागदाचा सुका लगदा वापरून या मूर्ती अत्यंत सुरक्षितपणे पॅक केल्या जातात.या बॉक्सवर संबंधित देशाचे नाव टाकून ते टेम्पोद्वारे जेएनपीटी बंदरात पाठवले जातात. तेथे एका मोठ्या कंटेनरमध्ये सुमारे ५ ते ६ हजार मूर्ती व्यवस्थित रचून त्या जहाजाद्वारे मार्गस्थ केल्या जातात. जहाजाद्वारे गणेशमुर्तींची निर्यात यंदा मे महिन्याच्या अखेरपर्यंत सुरु राहाणार आहे.

## सिडको पाणीपुरवठा क्षेत्रात २८ मेपासून करण्यात येणार १० टक्के कपात

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको क्षेत्रातील नोड तसेच गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांमधील जलसाठे, हवामान खात्याकडून वर्तविण्यात आलेले एल-निनो व आयओडी परिणाम, या पार्श्वभूमीवर गुरुवार २८ मे पासून सिडको पाणी पुरवठा क्षेत्रामध्ये १०टक्के पाणी कपात करण्याचा निर्णय सिडकोकडून घेण्यात आला आहे. नवी मुंबई महानगरपालिकेने २५ मे पासून आठवड्यातून दोन वेळा संध्याकाळचा पाणी पुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर सिडकोने पाणी कपात केल्याने नवीन पनवेल, खारघर नोड, उरण येथील नागरिकांना जलसंकटाला सामोरे जावे लागणार आहे.

सिडको क्षेत्रातील हेटवणे धरण, मोरबे धरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे बारवी धरण, मजीप्राचे पाताळगंगा धरण याद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढलेली असून तापमान वाढीमुळे जलाशयांमधील पाण्याचे बाष्पी भवनही वाढत आहे. त्याचबरोबर धरणातील उपयुक्त जलसाठा दिवसेंदिवस कमी होत असल्याचे निदर्शनास येत आहे. पावसाळा अपेक्षे पेक्षा उशिरा सुरू होण्याची शक्यता विचारात घेता. उपलब्ध पाणीसाठा धरण भरे पर्यंत पुरेल अशा पध्दतीने नियंत्रित व काटेकोर वापर करणे आवश्यक आहे. सदर सर्व स्रोतांतील उपलब्ध जलसाठा, प्राप्त होणारा दैनंदिन पाणी पुरवठा आणि स्थानिक पाणीवाटप यांचे सिडको प्रशासनामार्फत नियमित आढावा घेऊन नियोजन करण्यात येत आहे.

आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाई टाळण्याच्या दृष्टीने खबरदारीचा उपाय म्हणून सिडको क्षेत्रात गुरुवार २८ मेपासून १०टक्के पाणी कपात लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हेटवणे, मोरबे व इतर संबंधित जलस्रोतांच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पर्जन्यमान होऊन जलाशयातील उपयुक्त जलसाठ्यात अपेक्षित वाढ होईपर्यंत सदर पाणी कपात लागू राहील. अशा प्रकारचा पाणी कपातीचा निर्णय नवी मुंबई महापालिका, पनवेल महापालिका आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी आपल्या क्षेत्राकरिता घेतला आहे.

**सिडकोचे पाण्यासाठी वेळापत्रक**

| अ. क्र. | सिडको नोड | पाणीपुरवठा बंद राहण्याचा वार |
|---|---|---|
| १ | खारघर | सोमवार |
| २ | तळोजा | शुक्रवार |
| ३ | कळंबोली व नावडे | बुधवार |
| ४ | कामोठे | शुक्रवार |
| ५ | नवीन पनवेल (पूर्व) | सोमवार |
| ६ | नवीन पनवेल (पश्चिम) | मंगळवार |
| ७ | करंजाडे | गुरुवार |
| ८ | काळुंद्रे | शुक्रवार |
| ९ | उलवे गव्हाण-मोरावे गाव | मंगळवार |
| १० | न्हावा, शेवा व बामणडोंगरी | शुक्रवार |
| ११ | अ)उलवे | (से.-२५ व २५ए) |
|  | ब)द्रोणागिरी | रविवार |

## किरकोळ बाजारात भाज्यांचे दर ३० ते ४० टक्क्यांनी वाढले; वाढत्या उष्णतेमुळेही परिणाम



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाढत्या उष्णतेचा तडाखा, डिझेल दरवाढ आणि मालवाहतूक भाड्यात झालेली वाढ यामुळे नवी मुंबईतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) बाजारात भाजीपाल्याचे दर वाढले आहेत. घाऊक बाजारात भाजीपाल्याच्या दरात १५ ते २० टयांनी वाढ झाली असून त्याचा परिणाम किरकोळ बाजारातही जाणवत आहे. किरकोळ बाजारात भाज्यांचे दर ३० ते ४० टयांनी वाढल्याने सर्वसामान्य ग्राहकांचे घरगुती अर्थकारण कोलमडण्याची चिन्हे आहेत.

वाढत्या उष्णतेमुळे भाजीपाल्याच्या दर्जावरही परिणाम होत आहे. राज्याबाहेरून तसेच ग्रामीण भागांतून येणारा भाजीपाला वाहतुकीदरम्यान खराब होण्याचे प्रमाण वाढले आहे. महाराष्ट्राबाहेरून बाजारात पोहोचणाऱ्या मालातील मोठा हिस्सा सडलेला किंवा दर्जाहीन अवस्थेत असल्याने विक्रीयोग्य शेतमालाचे प्रमाण कमी होत आहे. परिणामी उपलब्ध भाजीपाल्याला अधिक दर मिळत आहेत.

एपीएमसीतील व्यापाऱ्यांच्या माहितीनुसार टोमॅटो, भेंडी, वांगी, हिरवी मिरची, मेथी, पालक, शेपू, कोथिंबीर, गवार आणि फरसबी दरात गेल्या काही दिवसांत मोठी वाढ झाली आहे. घाऊक बाजारातील ही वाढ किरकोळ बाजारात अधिक तीव्रतेने जाणवत असून ग्राहकांना रोजच्या खरेदीसाठी अधिक पैसे मोजावे लागत आहेत.

वाहतूक क्षेत्रालाही अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. इंधन दरवाढीसोबतच चालकांची कमतरता भासत असल्याचे वाहतूकदारांचे म्हणणे आहे. अनेक चालक सुट्टीवर असल्याने उपलब्ध वाहनांवर अतिरिक्त ताण पडत आहे. त्यातच वाढत्या खर्चाच्या तुलनेत विद्यमान भाडेदर परवडत नसल्याने भाडेवाढ अपरिहार्य असल्याचे वाहतूकदारांनी स्पष्ट केले.

सध्याची परिस्थिती पाहता येत्या महिनाभरात तरी भाजीपाल्याचे दर कमी होण्याची शक्यता कमी असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. इंधनदरवाढ, वाहतूक खर्च आणि उष्णतेचा परिणाम यामुळे भाजीपाला बाजारातील महागाई आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

पान १ वरुन

### 'भरारी २०२६' : गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि करिअर मार्गदर्शन शिबिर

एमकेसीएलचे महाव्यवस्थापक नटराज कटकधोंड यांनी विद्यार्थ्यांना एमएस-सीआयटी, क्लिक कोर्सेस तसेच एआय आधारित शिक्षण आणि भविष्यातील तंत्रज्ञान याबाबत मार्गदर्शन केले. आधुनिक युगात डिजिटल कौशल्यांचे महत्त्व वाढत असून विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा सकारात्मक आणि प्रभावी वापर करून स्वतःला सक्षम बनवावे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे आयोजन एमकेसीएल रायगड विभागाच्या वतीने करण्यात आले होते. पनवेल तालुक्यातील सर्व अधिकृत एमएस-सीआयटी केंद्रांचा या उपक्रमात सहभाग होता. उपस्थित विद्यार्थ्यांनी, पालकांनी आणि मुख्याध्यापकांनी कार्यक्रमाचे कौतुक करत हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी आणि मार्गदर्शक असल्याची भावना व्यक्त केली.

### मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी २६० कोटींच्या कृती आराखड्यास मंजुरी

हे नियंत्रण कक्ष अत्याधुनिक डिजिटल यंत्रणांनी सुसज्ज असतील. या नियंत्रण कक्षांद्वारे वन विभागाची संसाधने, वाहने आणि गस्ती पथकांचे ट्रॅकिंग करण्यात येईल. मानव-वन्यजीव संघर्षाची परिस्थिती उद्‌भवल्यास नियंत्रण कक्षाद्वारे संबंधितांना तत्काळ माहिती देऊन आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे, अशी माहिती मंत्री नाईक यांनी दिली.

वनक्षेत्राबाहेर वन्यप्राण्यांचे अस्तित्व आढळल्यास ग्रामस्थांना तत्काळ माहिती मिळावी यासाठी वनक्षेत्रालगतच्या गावांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित अलर्ट यंत्रणा प्रायोगिक तत्त्वावर उभारण्यात आल्या आहेत. या यंत्रणेची उपयुक्तता लक्षात घेऊन आता ही यंत्रणा राज्यातील सुमारे एक हजार गावांमध्ये उभारण्यात येणार आहे. यामुळे वन्यप्राण्यांच्या हालचालींची माहिती तातडीने ग्रामस्थांना मिळून ते दक्ष राहू शकतील. याशिवाय पकडलेल्या वन्यप्राण्यांसाठी रेस्क्यू सेंटर उभारण्यात येणार आहेत. तसेच वन्यप्राण्यांवरील उपचारांसाठी दहा ठिकाणी ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटरही उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

वन्यप्राण्यांच्या सुटकेसाठी २० ठिकाणी रॅपिड रेस्क्यू टीमची निर्मिती करण्यात येणार आहे. वनक्षेत्रालगतच्या गावांमध्ये वन्यप्राण्यांपासून संरक्षणासाठी वन विभागाच्या मदतीसाठी दोन हजार प्राथमिक प्रतिसाद दल (प्रायमरी रिस्पॉन्स टीम) तयार करण्यात येणार आहेत.

शेतपिकांचे नुकसान करणाऱ्या हरण, माकडे, रानडुक्कर आदी प्राण्यांना पकडण्यासाठी दोन फिरती पथके स्थापन करण्यात येणार आहेत. ज्या ठिकाणी या प्राण्यांचा उपद्रव होत आहे तेथे जाऊन या प्राण्यांना पकडून त्यांना पुन्हा वनक्षेत्रात सोडण्याचे काम ही पथके करणार आहेत. ही पथके अत्याधुनिक साधनांनी सुसज्ज असतील तसेच माकडे आणि रानडुकरांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी राज्यात दोन ठिकाणी नसबंदी केंद्रे उभारण्याचा प्रस्ताव आहे.

या उपाययोजनांमुळे मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यास मदत होणार असून शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसानही टळणार आहे. त्यामुळे या उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देशही मंत्री नाईक यांनी यावेळी दिले.

## पोलादपूर नगरपंचायतीच्या पोटनिवडणुकीत दोन अर्ज दाखल


**पोलादपूर :** नगरपंचायत पोलादपूरच्या प्रभाग १ च्या नगरसेविका व माजी नगराध्यक्षा सुनिता पार्टे यांच्या राजिनाम्यानंतर तब्बल वर्षभर रिक्त राहिलेल्या नगरसेवक पदाची पोटनिवडणूक प्रक्रिया सुरू झाली असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम मुदतीवेळी दोन सर्वसाधारण महिला उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे दाखल झाली आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीत यापैकी एक अर्ज मागे घेतला जाण्याची शक्यता अधिक असल्याने बिनविरोध निवडीचे संकेत प्राप्त होत आहेत.

पोलादपूर नगरपंचायत प्रभाग क्र. १ करिता निवडणूक निर्णय अधिकारी महाडचे तहसिलदार महेश शितोळे तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पोलादपूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विनय शिपाई हे काम पाहात असून २५ मे रोजी संगिता संतोष तुरडे आणि दर्शना संदीप सावंत या दोन महिला सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांची नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आली आहेत.

दि.२७ मे पासून २ जूनपर्यंत नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची मुदत आहे. नवनिर्वाचित नगरसेविकेस केवळ ५ ते ६ महिन्यांचा कालावधी मिळणार असून त्यानंतर पुन्हा तिसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीला नव्याने होणाऱ्या जनगणनेनुसार प्रभाग रचना आणि आरक्षणाप्रमाणे सामोरे जावे लागणार आहे.

## दुखवटा

### राजाराम खाडे



**पाली :** सुधागड तालुक्यातील रासळ येथील समाजसेवक राजाराम रामचंद्र खाडे यांचे नुकतेच वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी स्नेहलता खाडे, दोन मुले रविंद्र खाडे व नरेश खाडे, सुना रसिका खाडे व सुवर्णा खाडे, नातू अथर्व, तसेच जान्हवी, तन्वी, वैष्णवी आणि याज्ञिका अशा चार नाती असा मोठा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य मंगळवारी (ता. २६) त्यांच्या राहत्या घरी रासळ येथे होणार आहे.

### कमलाबाई श्रीश्रीमाळ



**कर्जत :** शहरातील कमलाबाई लालचंद श्रीश्रीमाळ (ओसवाल) यांचे अल्पशा आजाराने ७९ व्या वर्षी निधन झाले. माजी नगरसेवक जितेंद्र ओसवाल यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, एक कन्या, सूना नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

# चिंचपाडा परिसर हायमास्ट दिव्यांनी उजळला

## समीर केणी यांच्या प्रयत्नांना यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिडकोच्या माध्यमातून सेक्टर आर-२, चिंचपाडा येथील जिल्हा परिषद शाळा परिसरात नागरिकांच्या सुविधेसाठी आणि सुरक्षेसाठी आधुनिक हायमास्ट दिव्यांची उभारणी करण्यात आली आहे. या नव्या प्रकाशव्यवस्थेमुळे संपूर्ण परिसराचा कायापालट झाला असून स्थानिक रहिवाशांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. चिंचपाडा परिसरातील नागरिक, लहान मुले, युवक तसेच ज्येष्ठ नागरिकांना रात्रीच्या वेळी सुरक्षित आणि प्रकाशमय वातावरण मिळावे, हा या कामामागील मुख्य उद्देश आहे.



या हायमास्ट दिव्यांमुळे नागरिकांना सायंकाळी किंवा रात्रीच्या वेळी फिरण्यासाठी, लहान मुलांना खेळण्यासाठी आणि ज्येष्ठ नागरिकांना विरंगुळ्यासाठी एक उत्तम व सुरक्षित परिसर उपलब्ध झाला आहे. हे महत्त्वपूर्ण विकासकाम स्थानिक नेते समीर केणी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि अथक प्रयत्नांमुळे पूर्णत्वास आले आहे. परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी समीर केणी यांचे योगदान उल्लेखनीय राहिले आहे.

या विकासकामासाठी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांचे विशेष सहकार्य व मोलाचे मार्गदर्शन लाभले. या माध्यमातून लोकप्रतिनिधींच्या पाठबळावर चिंचपाड्याच्या वैभवात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

काम यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याबद्दल समीर केणी यांनी दोन्ही आमदारांचे आणि प्रशासनाचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.



**पनवेल : येथील एमटीएनएल मार्गावरील यशोबाळकृष्णा सीएचएसमध्ये पंढरीनाथ चहाची नवीन शाखा सुरू करण्यात आली आहे. महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते याचे उद्घाटन मंगळवारी झाले. यावेळी सभागृह नेते अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, नगरसेवक सुमित झुंजारराव, भाजप कामगार आघाडीचे उत्तर रायगड जिल्हा संयोजक रवी नाईक, रवींद्र कोरडे यांच्यासह पंढरीनाथ चहाचे फाऊंडर नितीन पार्टे, निमंत्रक विशाल आणेकर आदी उपस्थित होते.**

## निवडक

### कारची काच फोडून चोरी

**नवीन पनवेल :** कारची काच फोडून १ लाख २० हजार रुपयांची रोख रक्कम आणि सही केलेला कोरा चेक चोरून नेल्याची घटना खारघर सेक्टर-१३ येथे घडली. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात २५ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मकबूल दिनवारे हे तळोजा फेज-१ येथे राहत असून त्यांनी त्यांची कार ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल, सेक्टर-१३, खारघर येथील शाळेच्या गेटसमोर रस्त्याच्या बाजूला पार्क केली होती. चोरट्याने ड्रायव्हर सीटच्या मागील उजव्या बाजूच्या दरवाजाची काच फोडून कारमधील १ लाख २० हजारांची रोकड व सही केलेला चेक चोरून नेला.

### भागीदाराकडून ३३ लाखांचा गंडा

**नवीन पनवेल :** भागीदारीत घेतलेला फ्लॅट परस्पर विकून आलेली ३३ लाखांची रक्कम स्वतःच्या खात्यात वळवून फसवणूक केल्याप्रकरणी प्रदीप धोंडीराम पाटील (रा. खडक, उमरगा, लातूर) याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात २५ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी संजय यशवंत परदेशी हे करंजाडे येथे राहत असून त्यांनी प्रदीप पाटील यांच्या भागीदारीत इमारत विकसित करण्यासाठी प्रकल्प घेतला होता. २०२३ ते २०२६ या कालावधीत भागीदारीत विकसित केलेल्या साई दर्शन बिल्डिंग, करंजाडे येथील फ्लॅट संजय परदेशी यांना न कळवता विकून आलेले ३३ लाख रुपये भागीदार फर्मच्या खात्यात न टाकता स्वतःच्या खात्यात वळवून संजय परदेशी यांची फसवणूक करण्यात आली आहे.

### क्षुल्लक कारणावरून दाम्पत्याला मारहाण

**नवीन पनवेल :** सिगारेट पिऊ नका असे सांगितल्याच्या रागातून आरोपींनी दाम्पत्याला शिवीगाळ करत हाताबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना २४ मे रोजी खारघर येथे घडली. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात ३ अनोळखी पुरुष व ३ महिलांविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. जेहेब नाझीर कच्ची हे पनवेल येथे राहत असून ते कुटुंबासह ॲपल मेंट या हॉटेलच्या बाहेर जेवण करत बसले होते. त्यावेळी तिथे काही जण सिगारेट पीत होते. जेहेब यांनी त्यांना येथे सिगारेट पिऊ नका, असे सांगितले असता आरोपींना राग आला. त्यांनी जेहेब व त्यांच्या पत्नीला शिवीगाळ करून जेहेब यांना मारहाण केली व बघून घेण्याची धमकी दिली.

# जेएनपीए मराठी माध्यम स्कूलची धुरा आता साई संस्थेकडे

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्रात शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य साई संस्था (ट्रस्ट), डोंबिवली यांच्या शैक्षणिक संकुलाच्या शिरपेचात २०२६-२७ शैक्षणिक वर्षापासून जेएनपीए मराठी माध्यम स्कूलच्या रूपाने मानाचा तुरा खोवला गेला आहे. या विद्यालयाचा कारभार आता साई संस्थेच्या हातात आल्यामुळे परिसरातील पालक वर्गात आनंदाचे वातावरण असून उरण परिसरातून जेएनपीएचे अध्यक्ष, सचिव आणि संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

साई संस्था (ट्रस्ट) डोंबिवली या संस्थेच्या वतीने डोंबिवली येथे मराठी, गुजराती, इंग्रजी माध्यमांच्या शाळा तसेच रायगड-माणगाव येथे गेली २४ वर्षांपासून इंग्रजी माध्यमाची शाळा कार्यरत आहे. या सर्व विद्यालयांनी शालांत परीक्षेचा निकाल १०० टक्के लावून यशस्वी परंपरा राखली आहे. उरण येथे नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूल व कोल्हापूर गडहिंग्लज येथे ई. बी. गडकरी रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय, तसेच नरसू पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी ही महाविद्यालयेही संस्थेतर्फे चालवली जातात. प्रकल्पग्रस्त विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने जेएनपीए प्रशासनाने उरण येथील जेएनपीए वसाहत संकुलातील मराठी माध्यम शाळेची धुरा २०२६-२७ पासून साई संस्थेवर सोपवली आहे.

याबाबतची ऑर्डर ३० एप्रिल २०२६ रोजी संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. यासंदर्भात नरसू पाटील म्हणाले, "मी स्वतः शिक्षक असल्याने मला शैक्षणिक क्षेत्राची जाण आहे. जेएनपीए प्रशासनाने दाखवलेला विश्वास पूर्ण करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. येथील बहुसंख्य विद्यार्थी प्रकल्पग्रस्त असल्याने त्यांना पीएपीची सवलत मिळेल. चालू शैक्षणिक वर्षात कोणतीही फी वाढ होणार नाही. सरकारकडून अनुदान मिळवण्यासाठी जेएनपीएने परवानगी दिली आहे.



# प्रवासादरम्यान ७.६६ लाखांचा ऐवज लंपास

## तळोजा पोलिसांत गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

एसटी बस आणि रिक्षाने प्रवास करणाऱ्या ५५ वर्षीय व्यक्तीच्या बॅगेतून अज्ञात चोरट्याने ७ लाख ६६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, रोख रक्कम आणि महत्त्वाची कागदपत्रे चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास सुरू आहे.

तक्रारदार निवास कदम (५५) सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील आझादपूर येथे राहतात. ते एसटी बसने सातारा येथून पनवेलला येण्यासाठी निघाले होते. सायंकाळी पनवेल येथे एसटीतून उतरल्यानंतर रिक्षाने ते तळोजा नावडे फेज-२ मधील श्री गणेश सोसायटीतील घरी पोहोचले. घरी आल्यानंतर बॅग तपासली असता, त्यातील ४ तोळ्याची सोन्याची गंठण, दीड तोळ्याची लहान गंठण, कानातले सोन्याचे टॉप्स व फुले, डायमंडचे टॉप्स आणि अडीच तोळ्याची सोन्याची चेन, तसेच ५१ हजारांची रोख रक्कम, कदम व त्यांच्या पत्नीचे पॅनकार्ड आणि इतर मूळ कागदपत्रे असा एकूण ७.६६ लाखांचा ऐवज चोरीला गेल्याचे निदर्शनास आले.

एसटी आणि रिक्षा प्रवासादरम्यान गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने बॅगेतील दागिने व रोख रक्कम लंपास केल्याचे कदम यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी तळोजा पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अंतर्गत गुन्हा दाखल केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक बाबींच्या आधारे चोरट्याचा शोध सुरू केला आहे.

# पनवेल वाहतूक पोलिसांची तत्परता ; अपघातग्रस्त चालकाला जीवदान

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

आसूडगाव येथील इंडियन ऑईल पंपाजवळ २५ मे रोजी झालेल्या भीषण अपघातात वाहन चालकाचा पाय वाहनात अडकल्याने परिस्थिती गंभीर बनली होती. यावेळी पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील हे आपल्या पथकासह गस्तीवर असताना त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले.

अपघाताची तीव्रता लक्षात घेताच वाहतूक पोलिसांनी कोणताही विलंब न करता प्रसंगावधान राखून चालकाला वाहनातून सुखरूप बाहेर काढले.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी स्वतः मदतकार्यात सहभाग घेतल्याने संबंधित चालकाचे प्राण वाचविण्यात यश आले. पनवेल शहर वाहतूक शाखेच्या या तत्पर आणि संवेदनशील कामगिरीबद्दल नागरिकांकडून कौतुक व्यक्त करण्यात येत असून खाकी वर्दीतील माणुसकीचे पुन्हा एकदा दर्शन घडले आहे.

सदर वाहन चालकास पुढील कार्यवाहीसाठी कळंबोली वाहतूक शाखेच्या ताब्यात देण्यात आले आहे.



## खारघरमध्ये सात फुटी अजगराला जीवदान

**पनवेल : वार्ताहर**

खारघर शहरात उकाड्यामुळे वन्यजीव मानवी वस्तीत शिरकाव करत आहेत. खारघर सेक्टर ३५ मधील स्वप्नपूर्तीकडे जाणाऱ्या रस्त्यावर नागरिकांना अजगर दिसल्याने घबराट पसरली. साधारण सात फूट लांबीचा अजगर रस्त्यावरून लगतच्या गटारातील बिळात शिरला, मात्र पुढे रस्ता न मिळाल्याने तो गटारातच अडकला. घटनेची माहिती तत्काळ पुनर्वसू संस्थेला देण्यात आली. सर्पमित्र अष्टविनायक मोरे यांचे सहकारी भरत पुजारी घटनास्थळी दाखल झाले. सर्पमित्रांनी काळजीपूर्वक आणि सुरक्षित पद्धतीने रेस्क्यू ऑपरेशन करून अजगराची सुखरूप सुटका केली.

# पनवेलमध्ये नाट्य संस्कृती चळवळीला चालना



## नवोदित कलाकारांना अभिनयाचे बाळकडू; मनपा-नाट्य परिषदेचा उपक्रम

पनवेल शहर हे औद्योगिक, शैक्षणिक आणि नागरी विकासाबरोबरच सांस्कृतिक क्षेत्रातही आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत आहे. या सांस्कृतिक परंपरेला अधिक सक्षम व्यासपीठ मिळावे, नवोदित कलाकारांना अभिनयाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण उपलब्ध व्हावे आणि स्थानिक नाट्य चळवळीला नवसंजीवनी मिळावी या उद्देशाने पनवेल महानगरपालिकेने अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पनवेल शाखेच्या सहकार्याने आयोजित केलेले नऊ दिवसीय अभिनय प्रशिक्षण शिबिर हे खऱ्या अर्थाने एक सांस्कृतिक पर्व ठरले आहे. सलग दुसऱ्या वर्षी झालेल्या या शिबिरामुळे पनवेल क्षेत्रातील नाट्य संस्कृतीला नवसंजीवनी मिळाली आहे.

११ ते १९ मे या कालावधीत पनवेल, कळंबोली आणि खारघर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या शिबिराला विविध वयोगटातील कलावंत, विद्यार्थी, शिक्षक आणि नाट्यप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील आणि आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे तसेच अ.भा.म. नाट्य परिषद, शाखा पनवेलचे उपाध्यक्ष तथा माजी सभागृह नेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिराने पनवेल परिसरातील सांस्कृतिक चळवळीला नवी दिशा दिली आहे. पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, कळंबोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन आणि खारघर प्रभाग कार्यालय येथे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटनप्रसंगी विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, महापालिका सदस्य प्रिती जॉर्ज, डॉ. अस्मिता घरत, सुमित झुंजारराव तसेच अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे उपस्थित होते. या शिबिरात अभिनयाचे प्राथमिक तसेच उच्चस्तरीय प्रशिक्षण देण्यात आले. विशेष म्हणजे वय वर्षे ५ ते ६५ या विस्तृत वयोगटातील सुमारे १५० शिबिरार्थींनी यात सहभाग नोंदवला. प्रत्येकी २५ विद्यार्थ्यांच्या सहा बॅचेस तयार करून प्रशिक्षण देण्यात आले. अभिनय, संवादफेक, शरीरभाषा, आवाज, निरीक्षण क्षमता, व्यक्तिरेखा अभ्यास आणि रंगमंचीय सादरीकरण अशा विविध अंगांनी प्रशिक्षणाची मांडणी करण्यात आली होती.




मराठी चित्रपट, मालिका आणि वेबसीरीज क्षेत्रातील दिग्दर्शक-अभिनेता अभिजीत झुंजारराव यांनी अभिनयातील अचूक निरीक्षणाचे महत्त्व स्पष्ट करताना "किमान कृती, कमाल प्रभाव" या सूत्रावर भर दिला. "तालीम करताना चुका चालतील; मात्र रंगमंचावर चूक चालत नाही," या त्यांच्या वाक्याने प्रशिक्षणार्थींना अभिनयातील शिस्त आणि परिपूर्णतेची जाणीव करून दिली. ज्येष्ठ रंगकर्मी रवींद्र देवधर यांनी कलाकाराचा पहिला गुरू म्हणजे "आरसा" असल्याचे सांगत आत्मपरीक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले, तर ज्येष्ठ अभिनेते, निर्माते आणि दिग्दर्शक प्रमोद पवार यांनी आवाजाच्या शास्त्रशुद्ध प्रशिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. "कलावंत सातत्याने सजग राहिला तरच तो प्रगल्भ होतो," असा संदेश त्यांनी दिला. 'अनाजीपंत' फेम महेश कोकाटे यांनी अभिनय करताना व्यक्तिरेखा समजून घेण्याची आवश्यकता अधोरेखित केली. व्यक्तीची चाल, बोलण्याची लकब, व्यवसाय, लय-ताल आणि मानसिकता यांचे सूक्ष्म निरीक्षण केल्यास अभिनय अधिक प्रभावी होतो, असे त्यांनी सांगितले. या शिबिरातील आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे "नाट्यवाचन" हा अभिनव प्रयोग. प्रशिक्षणाच्या सहाव्या दिवशी 'स्नेहांकित पुणे' निर्मित 'एक्सपायरी डेट' या प्रहसनात्मक एकांकिकेचे अभिवाचन सादर करण्यात आले. धनंजय सरदेशपांडे लिखित आणि प्रा. रमाकांत मुळे दिग्दर्शित या सादरीकरणात प्रा. रमाकांत मुळे, अविनाश पाठक, स्वाती ओक, श्रुती मुळे-नांदापूरकर आणि डॉ. सचिन व्यवहारे यांनी सहभाग घेतला. ज्येष्ठ कलाकारांचे हे प्रभावी सादरीकरण नवोदितांसाठी प्रेरणादायी ठरले.

१९ मे रोजी फडके नाट्यगृहात शिबिराचा समारोप समारंभ उत्साहात पार पडला. प्रभागनिहाय प्रशिक्षणार्थींनी विविध विषयांवरील सादरीकरणे केली. अवघ्या दोन-तीन दिवसांत बसवलेल्या या कलाकृतींनी उपस्थितांची मने जिंकली. समारोपप्रसंगी महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष तथा नगरसेवक परेश ठाकूर, बाल रंगभूमी परिषदेच्या राज्य अध्यक्ष नीलम शिर्के-सामंत, प्रा. डॉ. संजय पाटील-देवळाणकर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिका सदस्य सुमित झुंजारराव, डॉ. अस्मिता घरत तसेच ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे उपस्थित होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनीही शिबिरास शुभेच्छा दिल्या. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, पनवेल शहर कला आणि क्रीडा क्षेत्रात सातत्याने प्रगती करत आहे. महापालिकेचा विकास हा केवळ पायाभूत सुविधांपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या सर्वांगीण प्रगतीशी निगडित आहे. सांस्कृतिक क्षेत्रात पनवेलची ओळख अधिक मजबूत करण्यासाठी अशा प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन अत्यंत आवश्यक आहे.

नगरसेवक परेश ठाकूर म्हणाले की, स्पर्धात्मक युगात स्वतःला प्रभावीपणे अभिव्यक्त करणे महत्त्वाचे आहे. अभिनय प्रशिक्षणामुळे व्यक्तिमत्त्व विकासास मदत होते आणि युवकांना आत्मविश्वास प्राप्त होतो. महापालिकेने भविष्यातही अशी शिबिरे आयोजित करावीत. बाल रंगभूमी परिषदेच्या राज्य अध्यक्ष नीलम शिर्के-सामंत यांनी पनवेलला बालरंगभूमीची शाखा लवकरच स्थापन करण्याबाबत दिलेले आश्वासन या अभिनय शिबिराचे फलित मानले जात आहे. शिबिरासाठी प्रशिक्षक म्हणून अशोक केंद्रे, संकेत खेडकर, विद्यानाथ सुर्वे, मनोज चिताडे व विक्रांत धीवरे यांनी मेहनत घेतली. महापालिकेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर व नाट्य परिषदेचे कार्यवाह शामनाथ पुंडे, गणेश जगताप, स्मिता गांधी, कविता ठाकूर यांच्या अथक प्रयत्नातून हा उपक्रम यशस्वी झाला. समारोपावेळी सर्व शिबिरार्थींना प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या प्रशिक्षण शिबिरामुळे पनवेल परिसरातील नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळालेच, शिवाय स्थानिक नाट्यसंस्कृतीला एक नवी ऊर्जा प्राप्त झाली आहे. भविष्यात राज्य शासनाच्या बालनाट्य स्पर्धा, नाट्यस्पर्धा आणि कामगार कल्याण मंडळाच्या विविध स्पर्धांमध्ये पनवेलचा प्रभावी सहभाग नोंदविण्यासाठीही हे शिबिर महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

**-वर्षा कुलकर्णी,**
**जनसंपर्क अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

## संपादकीय

# स्वार्थ आणि समंजसपणाची स्पर्धा

अफवांवर विश्वास ठेवू नका, अफवा पसरवू नका असे वारंवार सांगितले जात असले, तरी त्याचा विसर पडल्यास विस्कटलेली घडी पुन्हा नीट करण्याचे नवेच आव्हान उभे राहील, याचा विसर पडणे हिताचे नाही.

**समाजाच्या दैनंदिन व्यवहारांची घडी बिघडणार असे दिसू लागले की सामाजिक जाणिवा बोथट होऊ लागतात आणि स्वार्थास उधाण येते. परस्परांसोबतचे व्यवहार सामंजस्याचे असतील तर कोणत्याही समस्या सोडविणे सोपे होते. पण जेव्हा घडी बिघडण्याची चिन्हे दिसू लागतात तेव्हा समंजसपणा कमी होऊन स्वार्थ वाढीस लागतो आणि बिघडत चाललेली घडी अधिकच बिघडते. विशेषतः, अशा वेळी समंजसपणाने समस्येस सामोरे जाण्यात सर्वांचे हित असते. पण कदाचित कोणा एखाद्याने समंजसपणा दाखविला तर दुसरा कोणी त्याचा स्वार्थी गैरफायदा घेईल या भीतीपोटी समंजसपणा व स्वार्थाची स्पर्धा सुरू होते. साठेबाजी, काळाबाजार, टंचाई हे शब्द जेव्हा कानांवर आदळू लागतात, तेव्हा समंजसपणा आणि स्वार्थ यांचा संघर्ष सुरू झाला असे म्हणता येते. सध्या इराण-अमेरिका युद्धस्थितीमुळे देशातील ऊर्जासंकट काहीसे चिंताजनक वळणावर असल्याने, या संकटास सामोरे जाण्यासाठी समंजसपणा हाच उपाय असला तरी स्वार्थाची त्यावर कुरघोडी झालेली दिसते. त्यातूनच कृत्रिम टंचाई, काळाबाजार, साठेबाजीसारखे उद्योग सुरू होतात, आणि बहुधा त्यामुळे भ्रष्टाचारदेखील बोकाळतो. केवळ एका स्वार्थापोटी या समस्या अधिक तीव्र होत जातात असे दिसत असतानाही समंजसपणा दाखविण्याच्या मनस्थितीत सहसा कोणीच नसल्याने, स्वार्थाच्या स्पर्धेला जोर चढतो, आणि त्याला अफवांचे खतपाणी मिळाले की ही स्पर्धा शिगेला पोहोचते. सध्या महाराष्ट्रात पेट्रोल, डिझेलचा पुरेसा साठा आहे, आणि लोकांनी समंजसपणाने या इंधनाचा वापर केला, तर टंचाईची समस्या राहणार नाही अशी ग्वाही सरकारकडून सातत्याने दिली जात असतानाही, केवळ भविष्यात पेट्रोल-डिझेल मिळाले नाही तर कसे होणार, या भीतीपोटी साठेबाजीचे प्रकार सुरू झाल्याने टंचाईसदृश स्थिती दिसू लागली आहे. समंजसपणावर झालेल्या स्वार्थाच्या कुरघोडीचेच हे परिणाम आहेत. गेल्या काही दिवसांत राज्यातील पेट्रोल डिझेलच्या सरासरी वापराचे प्रमाण अचानक प्रचंड प्रमाणात वाढल्याचे सरकारने जारी केलेल्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. राज्याच्या पेट्रोल विक्रीत सुमारे 23 टक्के, तर डिझेल विक्रीत तब्बल 52 टक्के वाढ झाली आहे. काही जिल्ह्यांत डिझेल विक्रीत शंभर टक्के वाढ झाल्याचेही निदर्शनास आले आहे. लोकांनी साठेबाजी करण्यास सुरुवात केली असावी किंवा टंचाईच्या अफवांचा हा परिणाम असावा हे स्पष्ट आहे. पेट्रोल-डिझेलची उपलब्धता बहुतांश आयातीवर अवलंबून असल्याने आणि इराण युद्धामुळे आयातीच्या मार्गात निर्माण झालेल्या अडथळ्यांमुळे पुरवठा साखळी काहीशी विस्कळीत झाली आहे हे खरे असले, तरी राज्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून लोकांनी गरजेपेक्षा अधिक पेट्रोल किंवा डिझेल खरेदी करून साठवून ठेवल्यास टंचाईसदृश स्थिती निर्माण होऊ शकते. उपलब्ध साठ्याचा संयमाने किंवा. गरजेनुसार वापर केल्यास ही परिस्थिती टाळता येणे शक्य आहे. गेल्या काही दिवसांत इंधनाचे दरदेखील वाढले असून त्यामुळे महागाई वाढेल आणि पेट्रोल-डिझेलबरोबरच जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीदेखील आणखी वाढून त्याची झळ सर्वसामान्यांना सोसावी लागेल, तेव्हा साठेबाजीमुळे निर्माण होणाऱ्या टंचाईसदृश स्थितीचा त्यामध्ये मोठा वाटा असेल, हे स्पष्ट आहे. त्यामुळे, ही स्थिती आटोक्यात ठेवण्याकरिता स्वार्थ बाजूला ठेवून समंजसपणा आणि परस्पर सहकार्य याच बाबी महत्वाच्या ठरणार आहेत.**

# नाट्य-संस्कृती : लोककलेचा जागर







सह्याद्रीच्या कुशीत आणि अरबी समुद्राच्या साक्षीने वसलेला रायगड जिल्हा हा केवळ निसर्गसंपन्न नाही, तर सांस्कृतिकदृष्ट्याही समृद्ध आहे. इथल्या मातीत दशावतार, जाखडी, कोळीनृत्य, धनगरी गजा, भारूड, भजन, कीर्तन, पोवाडा, लावणी अशा विविध लोककला रुजल्या आहेत. गणपती उत्सव, शिमगा, होळी, नारळी पौर्णिमा या सणांना इथल्या लोककला अधिकच बहरतात. पेणचा गणपती जगप्रसिद्ध आहे, पण त्यासोबतच इथला दशावतारही तितकाच देखणा आहे. रात्रीच्या वेळी पेट्रोमॅक्सच्या उजेडात, ढोलकी-पखवाजच्या तालावर सादर होणारा दशावतार पाहणे हा अविस्मरणीय अनुभव असतो. पण काळाच्या ओघात, टीव्ही, मोबाईल, इंटरनेटच्या जमान्यात ही लोककला लोप पावत चालली आहे. तरुण पिढीला रिल्स, शॉर्ट व्हिडिओमध्ये रस आहे, पण आपल्या मातीतील कलेविषयी माहिती नाही. दशावतार करणारे कलाकार म्हातारे झाले आहेत, नवीन पिढी या क्षेत्राकडे येत नाही. कारण यात पैसा नाही, प्रसिद्धी नाही, शाश्वती नाही. कोळीनृत्य फक्त पर्यटनासाठी उरले आहे. धनगरी गजा वाद्य वाजवणारे हात कमी होत आहेत. जर ही कला जपली नाही, तर पुढच्या दहा-वीस वर्षांत ती फक्त पुस्तकात वाचायला मिळेल.

ही लोककला जिवंत ठेवण्यासाठी शासन, प्रशासन आणि समाज या तिघांनी एकत्र यायला हवे. सर्वप्रथम, शाळा-महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमात लोककलेचा समावेश करावा. 'एक दिवस लोककलेसाठी' हा उपक्रम राबवावा. महिन्यातून एकदा शाळेत दशावतार, भारूड, पोवाडा याचे प्रात्यक्षिक करावे. कलाकारांना शाळेत बोलावून त्यांच्याकडून मुलांना प्रशिक्षण द्यावे. यातून मुलांना आपल्या संस्कृतीची ओळख होईल आणि काही मुले आवड म्हणून ही कला शिकतील.

जिल्हा परिषदेने दरवर्षी तालुकास्तरावर आणि जिल्हास्तरावर 'रायगड लोककला महोत्सव' भरवावा. यात सर्व प्रकारच्या लोककलांना व्यासपीठ द्यावे. विजेत्या संघांना मोठी बक्षिसे द्यावीत. या महोत्सवाचे थेट प्रक्षेपण लोकल केबल आणि युट्यूबवर करावे. 'कोकण कला दर्शन' नावाने युट्यूब चॅनेल सुरू करून तिथे सर्व लोककलांचे ध्वनिमुद्रण अपलोड करावे. इन्स्टाग्राम, फेसबुकवर रिल्स बनवून तरुणांपर्यंत पोहोचवावे. कलाकारांना 'सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर' बनवावे.

लोककलाकारांच्या मानधनात वाढ करावी. त्यांना दरमहा पेन्शन योजना लागू करावी. वयोवृद्ध कलाकारांना सन्मानाने जगता यावे म्हणून 'कलाकार सन्मान योजना' राबवावी. घरकुल योजनेत त्यांना प्राधान्य द्यावे. त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती द्यावी. अलिबाग, माणगाव किंवा पेण येथे 'रायगड लोककला अकादमी' स्थापन करावी. येथे सर्व प्रकारच्या लोककलांचे शास्त्रोक्त प्रशिक्षण दिले जावे. संशोधन व्हावे. वाद्ये, वेशभूषा यांचा संग्रह करावा. पर्यटन विभागाने लोककलेचा वापर पर्यटनवाढीसाठी करावा. हॉटेल, रिसॉर्टमध्ये आठवड्यातून एकदा लोककला कार्यक्रम बंधनकारक करावा. परदेशी पर्यटकांसाठी विशेष शो आयोजित करावेत. 'कल्चरल टुरिझम'ला चालना द्यावी. पर्यटकांना दशावताराची वेशभूषा करून फोटो काढण्याची, ढोलकी वाजवण्याची संधी द्यावी. यातून कलाकारांना रोजगार मिळेल.

आकाशवाणी आणि दूरदर्शनवर रायगडच्या लोककलेवर आधारित कार्यक्रम नियमितपणे प्रसारित करावेत. 'लोकधार'सारखी मालिका पुन्हा सुरू करावी. शॉर्ट फिल्म, माहितीपट बनवून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय महोत्सवात पाठवावेत. संस्कृती ही कोणत्याही समाजाचा आत्मा असते. इमारती, रस्ते, उद्योग याने बाह्य विकास होतो, पण लोककला माणसाला आतून समृद्ध करते. ती जगली तर आपली माणुसकी, आपली परंपरा, आपले सण-उत्सव जगतील. रायगडचा विकास म्हणजे फक्त एमआयडीसी, विमानतळ, महामार्ग नाही. तर इथला दशावतारी, इथला कोळी, इथला धनगर यांची कला जगली पाहिजे. कारण 'कला जगली, तरच माणूस जगेल'.

लोकसहभागाशिवाय लोककला अपूर्ण शासनाच्या योजना कितीही भरीव असल्या तरी लोकांचा सहभाग नसेल तर लोककला टिकणार नाही. प्रत्येक गावाने आपल्या जत्रा, उत्सवात किमान एक स्थानिक लोककला सादरीकरणाला प्राधान्य द्यावे. गणेशोत्सव मंडळांनी स्पीकरवर डीजे लावण्याऐवजी एक दिवस दशावतार, एक दिवस भारूड-कीर्तनाचा कार्यक्रम ठेवावा. यामुळे खर्च कमी होईल आणि संस्कृती जपली जाईल. ग्रामपंचायतींनी आपल्या वार्षिक निधीतून 'लोककला संवर्धन निधी' राखीव ठेवावा. या निधीतून गावातील वृद्ध कलाकारांना मानधन, तरुणांना वाद्य खरेदीसाठी मदत करता येईल.शहरी भागातील सोसायट्यांनीही पुढाकार घ्यावा. सोसायटीच्या वार्षिक स्नेहसंमेलनात बॉलिवूड नाईटऐवजी 'कोकण नाईट' साजरी करावी. त्यात जाखडी, कोळीनृत्य, लावणी यांचे सादरीकरण करावे. मुलांना सुट्टीत 'लोककला कार्यशाळा' घेऊन दशावतारी मुखवटे रंगवणे, ढोलकी शिकणे, पोवाडा म्हणणे शिकवावे. यामुळे शहरात वाढणाऱ्या मुलांना आपल्या मुळांची ओळख होईल.डिजिटल युगात लोककलेचे पुनरुज्जीवन आजचा तरुण मोबाईलशिवाय राहू शकत नाही, मग हाच मोबाईल लोककलेसाठी वापरू. दशावतारातील एखादा संवाद, कोळीगीताची एक ओळ, धनगरी गजाचा ठेका - यावर आधारित 'रिल्स चॅलेंज' चालवावे. 'रायगड लोककला चॅलेंज' या हॅशटॅगखाली तरुणांनी आपले व्हिडिओ अपलोड करावेत. यातील सर्वोत्कृष्ट कलाकारांना जिल्हा प्रशासनाने सन्मानित करावे. ओटीटी प्लॅटफॉर्मवर 'कोकणातील गूढ कथा' या नावाने वेबसीरिज बनवावी, ज्यात दशावतार, भारूड यांचा वापर करून कथा सांगितली जाईल. शेवटी, कला ही मागून मिळत नाही, ती टिकवावी लागते. रायगडची ओळख किल्ले आणि समुद्रकिनारे आहेतच, पण खरी ओळख इथल्या लोककलेत आहे. आपण जर आज जागे झालो नाही, तर उद्या 'होती एक दशावतार नावाची कला' असे म्हणण्याची वेळ येईल. म्हणूनच प्रत्येक रायगडकराने ठरवावे - 'मी एक तरी लोककला शिकेन, शिकवेन आणि जपेन.'

(साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# संशयास्पद कॉलपासून असे राहा सावधान!

दूरसंचार विभागाने संशयास्पद कॉल घोटाळ्याबद्दल चेतावणी दिली होती. अलीकडेच अशा मोबाईल नंबरवरून अनेक वेळा कॉल आल्याने स्कॅमर्स पुन्हा त्याच पद्धतीचा अवलंब करीत असल्याचे उघडकीस आले. या कॉल्सवरील आधीच रेकॉर्ड केलेला संदेश ऐकू येतो. जेव्हा आपण दूरसंचार सेवा प्रदात्याला कॉल करतो तेव्हा ऐकतो त्यासारखाच हा रेकार्डेट आवाज वाटतो, ज्यामुळे लोकांना ही खरी माहिती आहे असे वाटते.



अशा संशयास्पद नंबरवरून कॉल येत असेल तर घाबरू नका. असे नंबर ब्लॉक करण्याचा सल्ला दिला जातो, कारण ते फसवणूक करण्यासाठी तुमची वैयक्तिक आणि आर्थिक माहिती काढून टाकण्याचा प्रयत्न करतात. हा स्वयंचलित कॉल डिस्कनेक्ट होण्यापूर्वी ४४ सेकंद चालतो. स्कॅमरचा संदेश (इंग्रजी आणि हिंदीमध्ये) वापरकर्त्यांना ग्राहक हेल्पलाइनच्या इंटरएक्टिव्ह व्हॉइस रिस्पॉन्स प्रमाणेच '९ दाबा' असे सांगण्यास करण्यास प्रवृत्त करतो.

या संशयास्पद कॉलमध्ये प्री-रेकॉर्डेड व्हॉईसचा दावा आहे की, तुमच्या नावावर नोंदणीकृत सर्व मोबाईल नंबर येत्या दोन तासांत डिस्कनेक्ट केले जातील. वास्तविक, दूरसंचार विभाग नागरिकांना असे कॉल करीत नाही आणि सेवा बंद करण्याची धमकी देत नाही. त्यामुळे अशा स्कॅमर्सना कॉलवर किंवा अन्यथा कोणताही वैयक्तिक तपशील शेअर करू नये. अशा प्रकारच्या दाव्यांना ग्राहकांनी बळी पडू नये आणि की-पॅडवरील कोणतीही बटण दाबू नये आणि कॉल रद्द करू नये असा सल्ला दिला जातो.

दूरसंचार विभाग वापरकर्त्यांना त्यांच्या दूरसंचार सेवा प्रदात्याकडून अशा दाव्यांची सत्यता पडताळून पाहण्यासाठी आणि अधिकृत चॅनेलद्वारे (अधिकृत वेबसाइट किंवा ऑफलाइन स्टोअरवरील संपर्क क्रमांक) कंपनीशी संपर्क साधण्याचासल्ला देखील देते. असे कोणतेही दावे अत्यंत संशयास्पद आणि नागरिकांना फसवण्याचा प्रयत्न मानले जातील. अशा कोणत्याही कृतीतून तुमची फसवणूक झाल्यास cybercrime.gov.inवर तक्रार करा. सुरक्षिततेचा उपाय म्हणून तुम्ही तुमच्या संपर्क सूचीमधून असे नंबर ब्लॉक करू शकता आणि तक्रार करू शकता. याशिवाय आकर्षक अर्धवेळ नोकऱ्यांचे आश्वासन देणारे तत्सम स्कॅम कॉल्स आणि मेसेजेसलाही बळी पडू नका.

# विकासपुरुष केंद्रीय मंत्री नितीन गडकरी



## निमित्त

उत्कृष्ट कल्पना आणि नाविन्यपूर्ण दृष्टिकोन असलेला द्रष्टा, निकाल मिळविण्यावर विश्वास ठेवणारा सक्षम प्रशासक, पक्ष कार्यकर्त्यांसाठी एक प्रतिष्ठित नेता, विरोधी पक्षात असताना सरकारला हाताशी धरणारा विरोधी पक्षनेता आणि सत्तेवर असताना विकासपुरुष... नितीन गडकरी यांच्या व्यक्तिमत्त्वाला उत्तम प्रकारे आणणारे शब्द मंत्री म्हणून उत्कृष्ट कामगिरी करतात. दुसऱ्या शब्दांत इथे लोकशाही घडवण्याची, वितरित करण्याची क्षमता असलेला नेता आहे! आज त्यांचा वाढदिवस.

एक अदम्य नितीन गडकरी ज्यांच्यासाठी राजकारण हे सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचे साधन आहे. गडकरी हे महाराष्ट्राच्या विदर्भातील नागपुरातून लोकसभेवर निवडून येतात. हा पूर्वी काँग्रेसचा पारंपरिक बालेकिल्ला, पण गडकरी यांनी सात वेळा विजेते विलास मुत्तेमवार यांचा सुमारे तीन लाख मतांच्या फरकाने पराभव केला.

वचनबद्ध अनुयायांमधून जागतिक दर्जाचे नेते घडवून इतिहास रचणाऱ्या स्व. भाऊराव देवरसांच्या स्मरणार्थ चारित्र्य, सामर्थ्य आणि कृतीची केंद्रित दिशा निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी नितीन गडकरी यांनी एक संस्था स्थापन करण्याचा विचार सुरू केला.


नितीन गडकरी यांचा जन्म २७ मे १९५७ रोजी महाराष्ट्रातील नागपूर शहरात एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात झाला, जे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालयदेखील आहे. गडकरींच्या आईचा त्यांच्यावर खूप प्रभाव राहिला आणि त्यांनी त्यांच्यामध्ये सामाजिक कार्याची भावना रूजवली. समाजाच्या सर्व घटकांच्या कल्याणासाठी काम करण्याच्या निःस्वार्थ प्रेरणेने आरएसएस आणि राष्ट्र उभारणीच्या मिशनद्वारे त्यांना त्यांच्या सुरुवातीच्या जीवनात प्रेरणा मिळाली.

जून १९७५मध्ये इंदिरा गांधींनी आणीबाणी लादणे हा गडकरी यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉइंट होता आणि त्यांनी कायद्याचा सराव करण्यापेक्षा देशसेवेसाठी आपले जीवन समर्पित करण्याचा निर्णय घेतला. गडकरी यांनी एमकॉम, एलएलबी आणि डिप्लोमा इन बिझनेस मॅनेजमेंट (डीबीएम)चे शिक्षण घेतले आहे.

गडकरी यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे विद्यार्थी नेते म्हणून राजकारणात प्रवेश केला आणि नंतर भाजपची युवा शाखा असलेल्या जनता युवा मोर्चामध्ये सहभागी झाले. तो स्वतःला करिअर राजकारणी मानत नाही, तर राजकारणाला समाजसेवा मानतात. गरीबांसाठी, समाजासाठी आणि दलितांसाठी प्रकल्प सुरू करतो.

गडकरी हे १९८९पासून महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य राहिले. १९९९-२००५पर्यंत ते महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेतेही होते. २००९पर्यंत त्यांनी महाराष्ट्र प्रदेश भाजपचे प्रदेशाध्यक्ष म्हणून नेतृत्व केले जेव्हा त्यांना भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून पदोन्नती करण्यात आली आणि ते पक्षाचे सर्वांत तरुण अध्यक्ष बनले. १९९५ ते १९९९दरम्यान ते महाराष्ट्रात सार्वजनिक बांधकाम मंत्री होते, जेव्हा त्यांनी पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेत पूर्ण केले. त्यांनी मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग बांधला. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# स्क्रीनकडे बघून डोळे सतत कोरडे होत असल्यास...



कोरोना साथीच्या काळात मोठ्यांपासून ते अगदी लहान मुलांमध्ये स्क्रीनकडे पाहण्याच्या वेळेत प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे आजच्या डिजिटल युगात अगदी अभ्यासापासून ते ऑफिसच्या कामानिमित्त प्रत्येकाला मोबाइलची गरज पडते. त्यामुळे स्क्रीनकडे दीर्घकाळ टक लावून पाहणे आता अगदीच सामान्य गोष्ट झाली आहे, पण यामुळे डोळे कोरडे पडण्याच्या किंवा इतर अनेक समस्यांना सर्वांनाच सामोरे जावे लागत आहे. या समस्येलाच ड्राय आय सिंड्रोम' असे म्हणतात.

स्क्रीन, एअर कंडिशनिंगच्या दीर्घकाळ संपर्कामुळे अनेक व्यक्तींना अस्वस्थता, जळजळ आणि दृष्टिदोषाचा त्रास होऊ लागतो. इन्स्टाग्रामवर कंटेन्ट क्रिएटर लन मँडेल याने या समस्येवर एक उपाय सुचविला आहे. हा उपाय म्हणजे तुम्हाला फक्त एका मिनिटासाठी तुमचे डोळे मिचकवायचे आहेत. जेव्हा आपण स्क्रीनकडे बराच वेळ एकटक पाहतो, तेव्हा डोळे कमी लुकलुकतात. यामुळे डोळे कोरडे होतात व जळजळ होते.

डोळ्यांची उघडझाप (मिचकावणे) या व्यायामाचा काळजीपूर्वक सराव केल्याने मेबोमियन ग्रंथी उघडू शकतात. पापण्यांच्या वरच्या बाजूला आणि खालच्या बाजूस असलेल्या लहान तेल-उत्पादक ग्रंथी आपल्या डोळ्यांसाठी आवश्यक आहेत. डोळे मिचकावण्याचा हा सोपा उपाय डोळ्यांच्या पृष्ठभागावर अश्रू समान रीतीने पसरण्यास मदत करते आणि त्यामुळे कोरडेपणा, जळजळ, अस्वस्थता टाळता येते.

दैनंदिन दिनचर्येत या व्यायामाचा समावेश करून पाहा. काही सेकंदांसाठी हळूवारपणे डोळे बंद करा. नंतर डोळे उघडा आणि फक्त डोळे मिचकावणे सुरू करा. तुमच्या डोळ्यात थोडे पाणी येईल आणि यामुळे दिवस चांगला होण्यास मदत होईल.

अथ्रेया सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील वरिष्ठ सल्लागार नेत्रविज्ञान नव्या सी. मंडेल यासुद्धा या उपायाशी सहमत आहेत. त्या म्हणाल्या की, डोळ्याच्या पृष्ठभागावर अश्रू समान रीतीने पसरवून डोळ्यांचे आरोग्य राखण्यासाठी डोळे मिचकावणे हे महत्वपूर्ण भूमिका बजावते, ज्यामुळे चिडचिड दूर होते.

डोळे लुकलुकल्याने अश्रू ग्रंथीमधून अश्रू स्राव सुलभ होतो. त्यामध्ये ओलावा आणि आवश्यक प्रथिने असतात, जी डोळ्यांच्या पृष्ठभागाचे संरक्षण करतात आणि कोरडेपणाचा सामना करतात. तथापि, गंभीर लक्षणांकडे दुर्लक्ष करून फक्त डोळे मिचकावण्याच्या व्यायामावर जास्त अवलंबून राहिल्याने अपुरा उपचार होऊ शकतो. संभाव्यतः स्थिती अधिक गंभीर होऊ शकते. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला घेणेही फायदेशीर ठरू शकते.

# जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना आता मिळणार गणवेशाची रक्कम

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद शाळेतील पहिली ते आठवीच्या ८९ हजार ७२८ विद्यार्थ्यांना नियमीत गणवेशाची रक्कम लवकरच मिळणार आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागाने त्याचे नियोजन केले असून शासनाकडून दोन कोटी १५ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. तालुका स्तरावर हा निधी वितरीत करण्याचे काम सुरु केले असल्याची माहिती जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे.



१५ जूननंतर शाळा सुरु होण्याची शक्यता आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वेळेवर मिळावे, तसेच शाळेच्या पहिल्या दिवसापासून गणवेश उपलब्ध व्हावे, यासाठी शिक्षण विभागाने प्रयत्न केला आहे. जिल्हा परिषद शाळा सुरु होण्यासाठी वीसहून अधिक दिवस शिल्लक राहिले आहेत.

शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना नियमीत गणवेश देण्यासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभाग कामाला लागले आहेत. रायगड जिल्हा परिषदेच्या पहिली ते आठवीपर्यंतच्या दोन हजार ४७३ शाळा आहेत. या शाळांमध्ये ९८ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.६७ हजारांवर विद्यार्थ्यांना मोफत गणवेशासह बूट,सॉक्स मुली शिक्षणापासून वंचित राहू नये, मागासवर्गीय आर्थिक दृष्ट्या घटकातील मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये, त्यांना शाळेबद्दल आकर्षण निर्माण व्हावे, यासाठी शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. सर्व मुली, अनुसूचित जाती, अनुसुचित जमाती, दारिद्रय रेषेखालील पालकांची मुले, सर्वसाधारण इतर मागासवर्ग घटकातील मुले अशा एकूण ८९ हजार ७२८ विद्यार्थ्यांना मोफत गणवेश दिले जाणार आहेत.

यासाठी दोन कोटी १५ लाख रुपयांचा निधीही शासनाकडून प्राप्त झाला आहे. तालुका स्तरावरून शाळा व्यवस्थापन समितीला हा निधी वर्ग केला जाणार आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना गणवेशाची रक्कम मिळणार आहे. मात्र यावर्षी फक्त २४० रुपयेच एका गणवेशामागे रक्कम दिली जाणार आहे. शासनाकडून फक्त ८० टक्के निधी प्राप्त झाला आहे. त्यामुळे तिनशे रुपयांच्या जागी २४० रुपये प्रमाणे निधी वितरीत केला जाणार आहे.

# जांभा दगडाच्या अवैध खाणी सील; तळा महसूल विभागाची कारवाई

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात सुरू असलेल्या अवैध जांभा दगड उत्खननावर तळा महसूल विभागाच्या वतीने धडक कारवाई सुरू झाली असून अवैध खाणी सील करण्यात आल्या आहेत.



मौजे चरई बुद्रुक येथील स.नं. ७२/५/ड व ७२/६ या ठिकाणी मे. अविष्कार रिॲलिटी, प्रा. लि. मुंबई यांच्या मालकीच्या जमिनीमध्ये जांभा दगड उत्खनन करण्याकरीता परवानगी देण्यात आली होती. ही जागा मे. अविष्कार रिॲलिटी, प्रा.लि. मुंबई तर्फे डायरेक्टर सुशिल नारायण कौशिक यांनी दोन वर्ष मुदतीसाठी भाडेकराराद्वारे जांभा दगड उत्खनन करण्यासाठी भोगील भुवण, समाधान लांडे, संदेश अधिकारी व शंकर चव्हाण यांना देण्यात आली होती. वांजलोशी येथील जमीन मालक गौऱ्या सखाराम पवार तसेच चालक राजू चव्हाण व मल्लेश राठोड यांना प्रांत कार्यालयाकडून अल्प/तात्पुरता मुदतीचा गौण खनिज उत्खनन परवाना आदेश निर्गमित करण्यात आलेला होता, मात्र सदर जांभा दगड खाणीमुळे पर्यावरणाची हानी होत असल्याबाबत तसेच हवेमध्ये धुळीचे प्रमाण वाढले असून नागरीकांना श्वसनाचे आजार होण्याचा धोका असल्यामुळे सदरहू जांभा दगड खाणी पुर्णपणे बंद करण्यात याव्यात याबाबत ग्रामस्थांनी तळा तहसीलदारांकडे लेखी तक्रार दाखल केली होती.

दाखल केलेल्या तक्रारींचे गांभीर्य लक्षात घेता तसेच स्थानिक पातळीवरील वस्तुस्थिती पाहीली असता परवानाधारकांना अल्प मुदतीचा खाण परवाना निर्गमित करतेवेळी शासनाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्याचे दिसून आले. यामुळे चरई बुद्रुक येथील पाच व वांजलोशी येथील दोन जांभा खाणींचा अल्प/तात्पुरता मुदतीचा गौण खनिज उत्खनन परवाना आदेश रद्द करण्यात येउन तळा महसूल विभागाच्या वतीने सदर ठिकाणच्या जांभा दगडीच्या खाणी सील करण्यात आल्या.

# पावसाची चाहूल लागताच मेंढपाळ निघाले परतीच्या प्रवासाला

**खोपोली : प्रतिनिधी**

कोकणात पावसाची चाहूल लागल्याने मेंढपाळ आपल्या मायभूमी कडे प्रस्थान करीत असल्याचे दिसत आहे .कारण घाटमाथ्यावर चार महिने या मेंढ्यांना मोठ्या प्रमाणात चारा उपलब्ध होत असतो, परंतु पाऊस शांत झाला की पुन्हा एकदा हा धनगर समाज आपल्या जवळील असलेला लवाजमा घेवून कोकणात येत असतात. साधारण दिवाळीमध्ये या मेंढपाळांचे कोकणात आगमन होत असते.

पावसाळ्यात विविध प्रकारची काटेरी वनस्पती निर्माण होत असते.यामुळे त्यांच्या चा-यांचा प्रश्न मार्गी लागत असतो.कोकणात आल्यानंतर मेंढपाळांचा प्रपंच आज इथे तर उद्या तिथे ऑक्टोबर-नोव्हेंबर ते मे -जून दरम्यान उघड्यावरच असतो. सुमारे २५० ते ३०० किलोमीटर मेंढपाळांना चाऱ्यासाठी भटकंती करावी लागत असते.

दरम्यान, पाऊस पडू लागल्याचे चिन्ह निर्माण होत असल्यामुळे मेंढपाळ मेंढय़ांचा कळप घेऊन आपल्या घरी परतीची वाट धरू लागले आहे. लवकरच ते आपल्या घरी परततील. पाऊस उशिरा पडला किंवा पावसाने दडी मारली, तर मेंढपाळांचा मुक्काम वाढत असतो.



# खालापूरच्या नागरिकांना २५ दिवसांनी सिलिंडर देण्याची मागणी



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्याचे ठिकाण शिवाय नगरपंचायत असताना देखील खालापूर शहराचा समावेश ग्रामीण भागात केल्याने घरगुती गॅस सिलेंडरसाठी पंच्चेचाळीस दिवस थांबावे लागत असल्याने नागरिकांनी तहसीलदार यांना निवेदन देत व्यथा मांडली आहे.

युद्धामुळे निर्माण झालेला गॅस सिलेंडर तुटवडा अद्याप पूर्ववत झालेला नाही. शासनाने ग्रामीण आणि शहरी भाग अशी विभागणी करत सिलेंडर मिळण्यासाठी दिवस मर्यादा घालून दिली आहे. शहरी भागासाठी पंचवीस तर ग्रामीण भागासाठी पंच्चेचाळीस दिवसाची मर्यादा घातली आहे. खालापूर तालुका ठिकाण असताना त्याठिकाणी राहणा-या नागरिकांना पंच्चेचाळीस दिवस थांबावे लागत असुन वितरकाला खालापूर ग्रामीण भागात असल्याचा शासनाचा जीआर देण्यात आला आहे.

वास्तविक खालापूर येथे नगरपंचायत असताना ग्रामीण शिक्का कसा असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. सोमवारी खालापूर शहरातील नागरिकांच्यावतीने सामाजिक कार्यकर्ते उमेश गावंड, मंगेश गोडसे, क्षमा आठवले, चंद्रकांत पारंगे,बाळा भगत, राजेश देसाई आणि संतोष साठे यांनी नायब तहसीलदार विकास पवार यांना निवेदन देत खालापूर नागरिकांना शहरी नियमानुसार घरगुती गॅस सिलेंडर मिळावा अशी मागणी केली.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

## जाहीर नोटीस

मी, उमर मेहमुद्दीन पटेल व ११, रा. सर्व तलोजे पाचनंद, ता. पनवेल, जि. रायगड या संमती पत्राद्वारे अशी संमती देतो की, मौजेः करवले बुद्रुक, ता. पनवेल, जिः रायगड, येथील शेतजमिनीचे वर्णन

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आ.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| करवले बुद्रुक | १ उमर मेहमुद्दीन पटेल<br>२ हुसेमियन मेहमुद्दीन पटेल<br>३ निसार मेहमुद्दीन पटेल<br>४ सिराज मेहमुद्दीन पटेल<br>५ मो सुफयान मेहमुद्दीन पटेल<br>६ रूक्साना बशिर अहमद पटेल<br>७ सुगरा म शफी पटेल<br>८ रिहाना अब्दुल मुत्तलीब पटेल<br>९ मोसीना ए अन्वर डिवडे<br>१० नसिमा गुलाम रसुल डोलारे<br>११ नफीसा नासिर पटेल<br>१२ मो. रफिक मेहमुद्दीन पटेल | २४/२ | ०.१३.१०<br>०.०३.००<br>०.१६.१०<br>हे.आर.पॉ | ०.२८ |
| | रा. सर्व तलोजे पाचनंद, ता. पनवेल, जि. रायगड | एकुण | ०.१६.१० | |

या मिळकतींचा विक्री व्यवहार आम्ही करण्याचे ठरविले आहे. सदरहू खरेदी-विक्रीच्या व्यवहाराची कल्पना तमाम जनतेस व्हावी, याकरीता मी स्वेच्छेने सदर मिळकतीची वर्तमान पत्रात ७ दिवसांची जाहिर पेपर नोटीस देण्यासाठी त्यांना अनुमती देत आहे. वर्तमान पत्रात जाहिर पेपर नोटीस देण्यास माझी/आमची हरकत व तक्रार काही नाही अशी संमती देत आहे.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २६/०५/२०२६**

**संमतीपत्र लिहून देणार-**
**सही/-**
**उमरेहमुद्दीन पटेल**
**( सर्वांच्या वतीने समंती देणार)**

# चौल येथे रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल येथील सुंदर नारायण मंदिरात रक्तदान शिबीरास उत्फुर्त्स प्रतिसाद रक्तदात्याचा लाभला, कै. समिर वैदय मित्रमंडळ, चौल याचे स्त्युत्य उपक्रमान कै.समीर वैदय स्मृती निमित्ताने प्रतिवर्षी रक्तदान शिबीर आयोजीत करण्यात येते.

दिवंगत मित्र कै.समिर वैदय यांनी समाजीक बांधिलकी ठेवून अनेक रक्तदान शिबीरे आयोजीत केली तसेच अनेक गरजू रक्तदात्यांना शासकीय रक्तपेढीमार्फत रक्त मिळवून दिले, त्यांचे कार्य नित्याने स्मरणात रहावे, यासाठी चौल कै.समीर वैदय मित्रमंडळ प्रतिवर्षी रक्तदान शिबीराचे आयोजन डॉ. केदार ओक यांचे मार्गदर्शनाखाली जयवंत नागवेकर, जितेश नागवेकर,संदेश बेडेकर, प्रशांत जाधव,ऋग्वेद जोशी,सुदर्शन वैदय आदी मित्रमंडळाचे सहकार्याने करण्यात येते. यावर्षी रविवार दि. २४ मे २०२६ रोजी चौल येथील सुंदर नारायण मंदिरात रक्तदान शिबीर घेण्यात आले. या रक्तदान शिबीरास रक्तदात्याने उत्तम प्रतिसाद दिले, उन्हाळयांचे दिवस असून सुध्दा ४१ जणांनी रक्तदान केले.

या रक्तदान शिबीरास जिल्हा शासकीय रक्तपेढीचे वतीने रक्त संक्रमण अधिकारी डॉ. दिपक गोसावी, सामाजीक अधिक्षक नवनाथ अली,समुपदेश मनोहर हाडस,रक्तपेढी तंत्रज्ञ हेमकांत सोनार, सुनिल बंदीछोडे, अभिषेक घटन,वैभव कांबळे,रामकुमार निकस, मंगेश भोये,महेश घाडगे, मंगेश पिंगळा आदींनी परिश्रम घेतले.

या रक्तदान शिबीरास जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राउळ यांनी सदिच्छा भेट दिली, व रक्तदान शिबीराच्या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक व्यक्त केले. शिवाय स्वतः रक्तदान केले. या शिबीरास कै. समिर वैदय मित्रमंडळ, चौल याचे वतीने सर्व रक्तदात्याचा विशेष सन्मान करण्यात आला.



# बजरंग दलाची हिंदू जनजागृती सभा उत्साहात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

अखिल आर्यावर्त संघ-आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष दिनेशदादा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली श्री महाकाल फार्म हाऊस, जु-नांदखी कांबे रोड येथे भव्य हिंदू जनजागृती सभा संपन्न झाली. राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमांचे पूजन व दिपप्रज्वलन संस्थापक अध्यक्ष दिनेशदादा पाटील,कोकण प्रांत अध्यक्ष प्रसिध्दी विभाग राकेश खराडे यांच्याहस्ते करण्यात आले.यावेळी शेकडो हिंदू बांधवांच्या उपस्थितीत दिनेश दादा पाटील यांनी विविध विषयांवर परखड भाषण केले.

हिंदूंनी वेळीच जागे होण्याची गरज आहे."लव जिहादच्या वाढत्या घटनांवर दिनेशदादा पाटील यांनी संताप व्यक्त केला. आपल्या मुलींना वाचवण्यासाठी प्रत्येक हिंदू घराने सतर्क राहिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. श्री मलंग गड हा मच्छिंद्रनाथांचा आहे. त्याच्या मुक्तीसाठी हिंदूंना सक्रिय व्हावे लागेल. सरकार हिंदुत्ववादी आहे मग बकरी ईदच्या दिवशी दुर्गाडी किल्ल्यावर आरतीसाठी हिंदूंना आंदोलन का करावे लागते? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

कार्यक्रमाचे आयोजक विशाल पाटील यांची ठाणे जिल्हा महामंत्री व पालघर जिल्हा पालक पदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी राकेश खराडे - कोंकण प्रांत अध्यक्ष सोशल मीडिया प्रमुख,जिल्हा अध्यक्ष सुभाष पाटील, संघटन मंत्री राजन टेकडीकर,जिल्हा मंत्री विशाल जैस्वाल, राकेश रायचुरा - भिंवडी शहर उपाध्यक्ष, यांच्यासह शेकडो हिंदू कार्यकर्ते उपस्थित होते.



## जाहीर नोटीस

माझे आशील श्री. वासुदेव चंदर पाटील व श्री. देवानंद वासुदेव पाटील दोहो मु. कोयनावेळे / घोट (तळोजा), ता. पनवेल, जि.रायगड ४१०२०६ यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे :-

**मौजे घोट, ता. पनवेल, जि. रायगड**
**हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत.**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मि. | आकार रू. पैसै |
|---|---|---|
| २०/३/२ | ०.०४.६० | ०.७८ |

येणे प्रमाणे वर्णनाचे जमिन मिळकतीत पनवेल महानगरपालिका मालमत्ता क्र. ४३५ ही चाळ वजा तळमजला अधिक तिन मजले अशी मिळकत /इमारत आहे. पनवेल महानगरपालिका मालमत्ता क्र. ४३५ हि मिळकत माझे अशिल क. २ यांचे नावे नोंदली आहे. माझे आशिल क. १ यांनी वर नमुद जमिन मिळकत श्री. बाबुराव कृष्णा भोईर, रा.राधा कृष्ण मंदिर जवळ, सेक्टर १०, कोपरा गाव, खारघर, ता. पनवेल, जि.रायगड ४१०२०६ यांस खरेदी दिलेली नाही. तसेच सदर मिळकतीचा कब्जा श्री. बाबुराव कृष्णा भोईर यांस दिलेला नाही. मात्र, श्री. बाबुराव कृष्णा भोईर याने माझे आशिल क. १ यांचा मुलगा संतोष वासुदेव पाटील व इतर यांचेशी संगनमत करून मौजे घोट गट कमांक व उपविभाग २०/३/२, क्षेत्र ०.०४.६० हे.आर., आकार रू. ०.७८ पैसे या मिळकती बाबत स्वतःचे नावे दिनांक २९.०६.२०२६ रोजीचे बेकायदेशीर खरेदीखत करून घेतले आहे..

माझे आशिल यांना सदर दिनांक २९.०६.२०२६ रोजीचे खरेदीखताची माहीती नुकतीच झाली आहे. माझे आशिल हे श्री. बाबुराव कृष्णा भोईर व इतर यांचे विरूध्द खरेदीखत रद्द करून मिळणे व इतर मागण्यां करीता पनवेल न्यायालयात स्वतंत्र दावा करणार आहेत. आता बेकायदेशीर खरेदीखताचा आधार घेवुन श्री. बाबुराव कृष्णा भोईर हे सदरहु जमिन मिळकतीत त्रयस्तांचे हक्क हितसंबंध निर्माण करण्याचे प्रयत्नात आहेत, असे समजते.

तरी, या जाहीर नोटीशी अन्वये सर्व लोकांस कळविण्यात येते की, श्री. बाबुराव कृष्णा भोईर, रा.राधा कृष्ण मंदिर जवळ, सेक्टर १०, कोपरा गाव, खारघर, ता. पनवेल, जि.रायगड - ४१०२०६ याचेशी मौजे घोट गट क्रमांक व उपविभाग २०/३/२, क्षेत्र ०.०४.६० हे.आर., आकार रू. ०.७८ पैसे या मिळकती बाबत कोणत्याही प्रकारचा खरेदी विक्री व्यवहार करू नये. त्यास माझे आशिल यांची सक्त हरकत आहे. कळावे.

**ठिकाण : अलिबाग**
**तारीख : २६.०५.२०२६**

**सही/-**
**(ॲड.एस.वाय. बारटके)**
**मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड**

## पनवेल महानगरपालिका
तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड ४१० २०६

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत मौजे- तळोजे मजकूर येथील सर्व्हे नं. ३२ पासून ते मौजे- तुर्भे येथील सर्व्हे नं. ४८ पर्यंत २४.०० मी. रुंदीच्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (४) अन्वये दि. २५/०६/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या विकास योजनानुसार २४.०० मी. रुंद नियोजित रस्त्याने बाधित मौजे-तळोजे मजकूर येथील सर्व्हे नं. ३८/१/अ मधून प्रस्तावित २४.०० मी. रस्त्याखालील बाधित क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी.आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णनः मौजे- तळोजे मजकुर, ता. पनवेल येथील श्री. रूपेश मधुकर पाटील व इतर यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील आरक्षणाने बाधित व रस्त्याने बाधित क्षेत्र पुढीलप्रमाणे :-१) मौजे- तळोजे मजकुर, सव्व्हे नं. ३८/१/अ रस्त्याने बाधित क्षेत्र १३८१.८१९ चौ. मी.

त्यास नकाशानुसार चतुःसीमा खालीलप्रमाणे -

पुर्वेस : ला.स.नं. ३९
पश्चिमेस : ला.स.नं. ४२
दक्षिणेस : ला.स.नं. ३८/२
उत्तरेस : ला.स.नं. ४१

टिप :- उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

**जा क्र. - पमपा/नरवि/टिडीआर/**
**२६-२६/३७३/२०२६**
**दिनांक : १९/०५/२०२६**

**सही/-**
**सहाय्यक संचालक नगररचना**
**पनवेल महानगरपालिका,**

टिप - सदरची जाहीर नोटीस पनवल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

# माहितीला विलंब झाल्याने अपिलार्थीला तब्बल १० लाखांची नुकसानभरपाई

## राज्य माहिती आयोगाचा ऐतिहासिक निर्णय

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीचे उत्तम उदाहरण राज्य माहिती आयोगाच्या निकालातून समोर आले आहे. नागरिकांना कशाप्रकारे न्याय मिळवून दिला जाऊ शकतो हे दर्शवणारा महत्त्वपूर्ण आणि सकारात्मक निर्णय आयोगाने दिला आहे. राज्य माहिती आयोगाच्या कोकण खंडपीठाचे आयुक्त शेखर चन्ने यांनी एका प्रकरणाचा सखोल अभ्यास करून माहिती मिळण्यास झालेल्या विलंबामुळे अपिलार्थींचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी १० लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश सार्वजनिक प्राधिकरणाला दिले आहेत.




पारदर्शकता आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी हा कायदा किती सक्षम आहे यावर या निर्णयामुळे पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. या प्रकरणातील अपिलार्थी जानबा परशुराम पाटील यांनी ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील एका मिळकतीबाबत तिच्या हस्तांतरणाच्या प्रक्रियेची आणि जुन्या कागदपत्रांची अधिकृत माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. सदर माहिती १९८६ ते १९९६ या जुन्या कालखंडातील असल्याने आणि त्यावेळी संबंधित प्रभाग समिती अस्तित्वात नसल्यामुळे प्रशासकीय पातळीवर या जुन्या दप्तरी अभिलेखांचा शोध घेण्याचे काम सुरू होते.

दरम्यान, माहिती मिळण्यास विलंब झाल्याने अपिलार्थींनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते. राज्य माहिती आयोगाने सुनावणीदरम्यान दोन्ही बाजूंचे म्हणणे अत्यंत सकारात्मकतेने आणि कायदेशीर चौकटीत राहून ऐकून घेतले. प्रशासनाच्या वतीने सहाय्यक आयुक्त बाळू हनुमंता पिचड यांनी आयोगासमोर वस्तुस्थिती मांडताना स्पष्ट केले की, संबंधित जुनी नस्ती शोधण्यासाठी कार्यालयाने तातडीने लिपिक आणि शिपायांचे विशेष शोधपथक तयार केले असून, निष्काळजीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय नियमांनुसार कारणे दाखवा नोटीस बजावण्याची शिस्तभंगविषयक कारवाईही सुरू करण्यात आली आहे. यावरून प्रशासनाचा हेतू माहिती दडपण्याचा नसून जुने रेकॉर्ड उपलब्ध करून देण्यासाठी त्यांचे प्रामाणिक प्रयत्न सुरू असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले.

शासकीय जमिनीवरील अतिक्रमित बांधकाम आणि झोपडीधारकांना शासनाकडून मिळणारे कायदेशीर संरक्षण या सर्व व्यावहारिक बाबींचा ताळमेळ घालत आयोगाने ही योग्य रक्कम निश्चित केली आहे. कायद्याची जरब आणि नागरिकांचे कल्याण या दोन्हींचा सुवर्णमध्य साधणारा हा निर्णय असून या प्रकरणाची पुढील सुनावणी बुधवारी (दि. २७) निश्चित करण्यात आली आहे. राज्य माहिती आयोगाच्या या भूमिकेमुळे सर्वसामान्य जनतेचा शासकीय यंत्रणांवरील आणि माहिती अधिकार कायद्यावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

### दिसला आयुक्तांचा दिलासादायक दृष्टिकोन

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणात राज्य माहिती आयुक्त शेखर चन्ने यांनी अत्यंत व्यापक आणि दिलासादायक दृष्टिकोन स्वीकारला आहे. सदर मिळकतीबाबत दिवाणी न्यायालयात आधीच एक दावा प्रलंबित आहे. न्यायालयात आपली बाजू सक्षमपणे मांडण्यासाठी आणि आपला हक्क प्रस्थापित करण्यासाठी नागरिकाला या शासकीय कागदपत्रांची अत्यंत गरज असते, ही बाब आयोगाने प्रकर्षाने अधोरेखित केली. जरी हे अभिलेख जुने असल्याने मिळण्यास तांत्रिक अडचणी येत असल्या तरी माहितीअभावी नागरिकाचे हक्क हिरावले जाऊ नयेत हा संवेदनशील विचार आयोगाने मांडला.

# पनवेल रेल्वेस्थानक होणार अद्ययावत

## खासदार श्रीरंग बारणे यांच्याकडून कामांचा आढावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रवाशांच्या सुलभ, सुरक्षित आणि आधुनिक प्रवासाच्या दृष्टीने सुरू असलेल्या पनवेल रेल्वे स्थानक विस्तारीकरण तसेच पनवेल-कर्जत नवीन रेल्वे मार्गिका प्रकल्पाच्या कामांची खासदार श्रीरंग बारणे यांनी मंगळवारी (दि. २६) प्रत्यक्ष पाहणी करून सविस्तर आढावा घेतला. यावेळी रेल्वे विभाग आणि मुंबई रेल्वे विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत विविध विकासकामांच्या प्रगतीची माहिती घेण्यात आली.

दररोज लाखो प्रवाशांची वर्दळ असलेल्या रेल्वे स्थानकाच्या विस्तारीकरणाचे काम २०२२ पासून सुरू असून सध्या ५० टक्के काम पूर्ण झाले. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प दोन टप्प्यांत राबविण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात मुंबई रेल्वे विकास महामंडळामार्फत पनवेल-कर्जत नवीन मार्गिका व स्थानकाच्या अर्ध्या भागाचे काम सुरू आहे. दुसऱ्या टप्प्यात रेल्वे बोर्डामार्फत उर्वरित विकासकामे केली जात आहेत. या प्रकल्पांतर्गत अत्याधुनिक लिफ्ट, एस्केलेटर, विस्तीर्ण पार्किंग व्यवस्था, व्यापारी संकुल, प्रवाशांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. स्थानकाचे महत्त्व वाढणार असून लाखो प्रवाशांना याचा मोठा लाभ होणार आहे.

यावेळी खासदार बारणे यांनी पनवेल-कर्जत मार्गिकेच्या कामाची प्रगती समाधानकारक असल्याचे सांगत मार्गिकेचे काम ८० ते ९० टक्के पूर्णत्वाकडे गेल्याची माहिती दिली. स्थानक विस्तारीकरणाचे कामही गतीने पूर्ण करून अद्ययावत आणि आधुनिक पनवेल रेल्वे स्थानक लवकरात लवकर जनतेच्या सेवेत दाखल करण्याचे निर्देश संबंधित प्रशासनाला दिले. या पाहणी दौऱ्यात पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, प्रकल्प व्यवस्थापक योगेश कुमार शर्मा, उपप्रकल्प व्यवस्थापक लक्ष्मीकांत जांगपांगे, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, नगरसेवक अजय बहिरा, प्रथमेश सोमण, सुमित झुंजारराव, नगरसेविका प्रियंका कांडपिळे, डॉ. अस्मिता घरत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील, उपमुख्य अभियंता एल. वायझन पांडे, प्रकल्प अभियंता मनीष कुमार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# मुख्यमंत्री पंचायतराज अभियानांतर्गत जासई ग्रुप ग्रामपंचायतीचा द्वितीय क्रमांक

**उरण : बातमीदार**

राज्यातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकार जनहितासाठी विविध अभियान राबवत असते. महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री पंचायतराज अभियान अंतर्गत उरण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत जासईला तालुक्यातून दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यानुसार १२ लाख रुपये ग्रामपंचायतीला मिळणार आहेत.



मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाद्वारे ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी राबविण्यात येणारे महत्त्वाकांक्षी अभियान आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना (जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायती) कार्यक्षम बनवणे, शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहचवणे उद्देश आहे. अभियानांतर्गत स्थानिक संस्थांच्या कामाचे मूल्यमापन केले जाते. ग्रामपंचायतींमध्ये लोकसहभाग वाढवणे, कर वसुली व डिजिटल सेवांचा वापर यांसारख्या निकषांवर आधारित उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्थांचा गौरव केला जातो.

# वीजचोरांना महावितरणचा दणका

**नवी मुंबई : बातमीदार**

चोरीची वीज वापरणाऱ्यांविरोधात महावितरणने कारवाईचा धडाका सुरू केला आहे. गेल्या दोन दिवसांत सहा जणांवर वीजचोरीप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये मीटरमध्ये फेरफार करणाऱ्यांसह अवैध जोडणीतून वीजपुरवठा घेणाऱ्यांचा समावेश आहे. देशात विजेचा तुटवडा भासत असून, दरवर्षी उन्हाळ्यात विजेचा वापर मोठ्या प्रमाणात वाढतो. त्यामुळे भार वाढल्याने शॉर्टसर्किट होऊन आग लागण्याचे प्रकारही घडतात. महावितरणच्या भरारी पथकाकडून अवैध वीजजोडण्यांचा शोध घेऊन सातत्याने कारवाई केली जात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# सानपाडा नोडला दूषित पाण्याचा विळखा

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा नोड (कॉलनी), सानपाडा गाव व सानपाडा पामबीच वसाहत परिसर दूषित पाण्याच्या विळख्यात सापडला आहे. या भागातील रहिवाशांना तातडीने शुद्ध पाणीपुरवठा करून दिलासा द्यावा, अशी मागणी अखिल भारतीय माथाडी संघटनेचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

गेल्या काही दिवसांपासून सानपाडा नोड (कॉलनी), सानपाडा गाव व सानपाडा पामबीच वसाहत येथील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये पिवळसर रंगाच्या दूषित पाण्याचा पुरवठा होत आहे. पाणी उकळून व गाळून घेतले तरी पिवळसरपणा जात नाही. या दूषित पाण्यामुळे परिसरातील अनेकजण आजारी पडले आहेत. पावसाळा काही दिवसांवर आलेला असून सुरुवातीच्या काळात गढूळ पाणी येण्याची समस्या अधिकच वाढते. त्यामुळे या दूषित पाण्याच्या समस्येचे तातडीने निवारण न झाल्यास अनेकांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर सानपाडा नोड (कॉलनी), सानपाडा गाव व सानपाडा पामबीच वसाहतीतील नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा करून दिलासा देण्याची मागणी माथाडी नेते पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

# नवी मुंबईत आज 'निधी आपके निकट २.०'

## पीएफ, पेन्शनच्या तक्रारींचे जागेवरच होणार निवारण

**नवी मुंबई : बातमीदार**

कर्मचारी भविष्य निधी संघटना (ईपीएफओ), प्रादेशिक कार्यालय, वाशी यांच्या वतीने पीएफ खातेदार, नव्याने समाविष्ट संस्थांचे प्रतिनिधी तसेच पेन्शनधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी 'निधी आपके निकट २.०' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम बुधवारी (दि. २७) नेरुळ येथील डीएवी शाळेत पार पडणार आहे.

हा कार्यक्रम सीवूड्स परिसरातील प्लॉट क्र. ३४, सेक्टर ४८, सूर्योदय सोसायटी, कर्वेनगर, नवी मुंबई येथे होणार असून यामध्ये पीएफ, पेन्शन तसेच नव्याने समाविष्ट संस्थांशी संबंधित विविध तक्रारी आणि अडचणींचे प्रत्यक्ष निराकरण करण्यात येणार आहे. खातेदारांना त्यांच्या कामासाठी वाशी येथील प्रादेशिक कार्यालयात येण्याची गरज पडू नये यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे ईपीएफओकडून सांगण्यात आले. तसेच नव्याने पीएफच्या कक्षेत आलेल्या संस्थांच्या नियोयांना पीएफसंदर्भातील मार्गदर्शनही यावेळी उपलब्ध करून दिले जाणार आहे.

प्रादेशिक भविष्य निधी आयुक्त जे. पी. चौहान यांनी सांगितले की, 'निधी आपके निकट २.०' उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येत असून नियुक्त नोडल अधिकारी नागरिकांच्या समस्या ऐकून तत्काळ निराकरण करण्याचा प्रयत्न करतील. पेन्शनधारकांनी उपस्थित राहून सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# कॉल सेंटरद्वारे विमा फसवणूक; ६१ लाख लुटणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**नवी मुंबई : बातमीदार**

'भारती ॲक्सा' जीवन विमा पॉलिसी बंद करण्याच्या नावाखाली नागरिकांची तब्बल ६१.४५ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी नवी मुंबई सायबर पोलिसांनी दिल्लीतील जाफराबाद परिसरातून एका आरोपीला अटक केली आहे. या प्रकरणात आंतरराज्यीय सायबर टोळीचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.




१ जुलै २०२५ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत आरोपीने फिर्यादीशी संपर्क साधून स्वतःला विमा कंपनीचा प्रतिनिधी असल्याचे भासवले. पॉलिसी बंद करण्याच्या प्रक्रियेच्या नावाखाली 'एजंट कोड', 'बीटीसी कोड', कागदपत्र प्रक्रिया आणि कॅश कन्व्हर्जन अशा विविध बहाण्यांनी वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास प्रवृत्त करण्यात आले. या कालावधीत फिर्यादीकडून एकूण ६१,४५,५८० रुपये इतकी रक्कम उकळण्यात आली. मात्र कोणतीही वैध प्रक्रिया पूर्ण न करता ही रक्कम परत न देता फसवणूक करण्यात आली.

या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील संबंधित कलमांनुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तपासादरम्यान सायबर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपीचा मोबाइल क्रमांक आणि आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेतला. त्यातून आरोपीचे ठिकाण दिल्लीतील जाफराबाद परिसर असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पथकाने तेथे छापा टाकून शाहरूख मेहताब खान याला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने अन्य साथीदारांसोबत संगनमत करून कॉल सेंटर पद्धतीने नागरिकांना फसवण्याचे काम केल्याची कबुली दिली असून कामाच्या मोबदल्यात आर्थिक लाभ मिळाल्याचेही स्पष्ट झाले. या प्रकरणात आणखी काही आरोपींचा सहभाग असल्याचा संशय असून त्यांचा शोध सुरू आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सहपोलीस आयुक्त दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त प्रमोद शेवाळे व पोलीस उपआयुक्त (गुन्हे) सचिन गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहाय्यक पोलीस आयुक्त धर्मपाल बनसोडे यांच्या निरीक्षणाखाली सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विशाल पाटील व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# पनवेल प्रभाग २मध्ये नालेसफाईला वेग

## नगरसेवक दिनेश खानावकरांकडून पाहणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या प्रभाग क्रमांक २मधील पावसाळ्यापूर्वीच्या नालेसफाईच्या कामांना गती देण्यासाठी नगरसेवक दिनेश खानावकर यांनी प्रत्यक्ष पाहणी करत संबंधित अधिकारी आणि ठेकेदाराला आवश्यक सूचना दिल्या. प्रभागातील पावसाळी नाले मनुष्यबळ व यंत्रसामग्रीच्या सहाय्याने वेळेत स्वच्छ व्हावेत, यासाठी नियुक्त ठेकेदाराकडून जेसीबी मशीन मागवून नावडे गावातील विविध पावसाळी नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

यावेळी नाल्यांची ठिकाणे दाखवून देत त्यांची तातडीने आणि प्रभावी साफसफाई करण्याच्या सूचना नगरसेवक खानावकर यांनी दिल्या. तसेच कातकरीवाडी परिसरातील गटारांवरील पडलेले स्लॅब दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले असून त्या कामाचीही त्यांनी पाहणी केली. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला देण्यात आले. पावसाळ्यात पाणी साचणे, पूरस्थिती निर्माण होणे आणि नागरिकांना होणारा त्रास टाळण्यासाठी प्रभागातील सर्व नाले व गटारांची नियमित साफसफाई करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नगरसेवक दिनेश खानावकर यांच्या पुढाकारामुळे प्रभागातील पावसाळी पूर्वतयारीच्या कामांना वेग आला असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# भाजप महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा



**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टीच्या उत्तर रायगड जिल्हा महिला मोर्चाच्या अध्यक्षा प्रिया मुकादम यांच्या वाढदिवसानिमित्त कळंबोली येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. समाजाप्रति बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमानिमित्त सामाजिक हिताचे विविध उपक्रम राबविण्यात आले.

उपस्थित मान्यवरांनी प्रिया मुकादम यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा गौरव करत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. महिला सक्षमीकरण, सामाजिक सेवा आणि संघटनात्मक कार्यामध्ये त्यांनी दिलेल्या योगदानाचे कौतुक करण्यात आले.

या कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम, नगरसेवक रवींद्र भगत यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# युवा नेते विश्वजीत पाटील यांचा वाढदिवस सेवाभावी कार्याने साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा पनवेल तालुका पूर्व मंडल अध्यक्ष विश्वजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी (दि. २६) 'अन्नदान सेवा' हा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला. पनवेल तालुक्यातील करुनेश्वर हॉल्टेज केअर हाऊस, भानगड येथे आयोजित या कार्यक्रमात गरजूंना अन्नदान करून समाजसेवेचा आदर्श घालून देण्यात आला.

या उपक्रमाला भाजपचे ज्येष्ठ नेते व राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, उत्तर रायगड जिल्हा युवा मोर्चाचे अध्यक्ष आनंद ढवळे, जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, उत्तर मंडळाचे सरचिटणीस अंकुश पाटील तसेच कुंडेवहाळ ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सदाशिव वास्कर यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विश्वजीत पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याचे कौतुक केले. वाढदिवस साजरा करण्याबरोबरच समाजातील गरजूंना मदतीचा हात देण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमात मोठ्या संख्येने लाभार्थींनी अन्नदानाचा लाभ घेतला.



# चौक रेल्वे स्टेशनची खासदार बारणेंकडून पाहणी

**चौक : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघा चे खासदार श्रीरंग बारणे यांनी आज कर्जत पनवेल रेल्वे मार्गाच्या पाहणी बरोबर चौक रेल्वे स्थानकाची पाहणी करून संबंधित यांना योग्य सूचना केल्या.

कर्जत पनवेल रेल्वे मार्गाच्या दुहेरी रेल्वे मार्गाच्या कामाची आज खासदार श्रीरंग बारणे यांनी पाहणी केली,पनवेल कर्जत रेल्वे मार्गाच्या दुहेरी रेल्वे मार्गाचे काम सुमारे ९५ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती देण्यात आली असून चौक रेल्वे स्थानकाचे काम प्रगतीवर असून अंतिम टप्प्यात आहे.



चौक-कर्जत रेल्वे मार्ग हा पनवेल-कर्जत उपनगरीय रेल्वे प्रकल्पाचा एक महत्त्वाचा भाग आहे. २,७८२ कोटी रुपये खर्चून विकसित होत असलेला हा २९.६ किमी.चा दुहेरी मार्ग प्रवाशांचा प्रवास वेगवान आणि सुखकर करेल. या मार्गामुळे पनवेल ते कर्जत दरम्यानचा दीड तासाचा रस्ता अवघ्या ४० मिनिटांत पार करता येईल.या मार्गावर एकूण पाच स्थानके असणार आहेत.पनवेल,चिखले, पोयंजे,चौक,कर्जत याच बरोबर ३ बोगदे आहेत.यात वावरले येथे असलेला २.६३ किमी लांबीचा बोगदा हा मुंबई उपनगरीय रेल्वेतील सर्वात लांब बोगदा ठरणार आहे. २९.६ किमी मार्गावर एकूण ४७ लहान-मोठे पूल बांधण्यात आले आहेत. ट्रॅकच्या मजबुतीसाठी खडीविरहित 'बॅलास्टलेस ट्रॅक' (Ballastless Track) तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.हा मार्ग सुरू झाल्यामुळे कल्याण मार्गे प्रवास करणाऱ्या लोकल गाड्यांमधील प्रचंड गर्दी कमी होण्यास मदत होईल.

चौक, मोहापे, चिखले आणि इतर परिसरातील प्रवाशांना थेट नवी मुंबई (पनवेल) आणि मुंबईपर्यंत उपनगरीय रेल्वे सेवा उपलब्ध होईल.प्रकल्पाचे ९५ टक्क्यांपेक्षा जास्त काम पूर्ण झाले असून चौक ते कर्जत दरम्यान रेल्वे इंजिनची यशस्वी चाचणीही पूर्ण झाली आहे. उर्वरित काम अंतिम टप्प्यात असून हा मार्ग लवकरच सर्वसामान्यांसाठी खुला होणार आहे, असे खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले.

यावेळी रेल्वेचे प्रमुख वरिष्ठ अधिकारी, जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, व्यापारी विजू ठाकरे, चौक व्यापारी संघटनेचे अध्यक्ष हर्षद हनुमंते, माजी उपसरपंच गणेश कदम यांच्यासह प्रवाशी संघटना, नागरिक उपस्थित होते. आधुनिक यंत्रसामुग्री आणि कामाच्या प्रगतीवर खासदार श्रीरंग बारणे यांनी समाधान व्यक्त केले.

# पाण्यासाठी पशुपक्षी, प्राणी मानवी वस्तीकडे

## रोह्यात नायब तहसीलदार वैशाली काकडे भाबड यांनी माकडांना पाजले पाणी

**रोहा : प्रतिनिधी**

जंगल नष्ट होत आहे तर दुसरीकडे सूर्यनारायणाचा प्रकोप वाढत असल्याने रोह्यात पशुपक्षी, प्राणी पाण्यासाठी शहरी वस्तीकडे येताना दिसत आहेत. अशीच घटना मंगळवारी सकाळी रोहा तहसीलदार कार्यालयात घडले असून पाण्यासाठी चक्क माकडे तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार यांच्या दालनातील पाणी बॉटल घेताना दिसत होते.

ही माकडांची धडपड बघून नायब तहसीलदार वैशाली काकडे भाबड यांनी या माकडांना ग्लास व पाण्याच्या बाटलीतून पाणी पाजले आहे. नेहमीच कामात व्यस्त असलेल्या अधिकारी नायब तहसीलदार वैशाली काकडे भाबड यांनी माकडांना पाणी देत प्राण्या प्रती



प्रेमाची व आपुलकीचे भावना व्यक्त केली आहे. हे दृश्य पाहत असताना त्यांच्या अस्तित्व असलेले जंगल नष्ट होत असल्यामुळे त्यांना अन्नासाठी व पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असल्याचे दिसून आले.

रोहा तालुका हा चहुबाजूनी डोंगरदऱ्याने वेढलेला आहे. पूर्वी हा डोंगर घनदाट झाडांनी वेढलेला असत. या जंगलात ससा, रानडुक्कर, भेकर, रानमांजर, माकडे, मोर असे अनेक पक्षी, प्राणी आढळून येत असत. परंतु सातत्याने वृक्षतोड होत असल्याने हे जंगल आता बकाल झाल्याचे दिसून येते. त्यामुळे या प्राण्यांच्या अस्तित्वाच्या प्रश्न निर्माण झाला आहे. आता हे प्राणी नागरी वस्तीकडे अन्न व पाण्यासाठी वळू लागले आहेत. रोहा शहरात सातत्याने मोठ्या प्रमाणात माकडे येताना दिसतात. ठिकठिकाणी विविध इमारतीमधून, घरावर हे माकडे अन्नाच्या शोधात फिरताना दिसत आहेत.

यावर्षी उन्हाचा तडाका वाढल्याने पिण्याचा पाण्याचा प्रश्न निर्माण होत असल्यामुळे रानातील माकडे व पशु, प्राणी पाण्यासाठी शहराकडे व मानवी वस्तीकडे येताना दिसत आहेत.शासनाच्या वनखात्याकडे अनेक योजना दरवर्षी राबवल्या जातात. अशा योजना राबवत असताना त्याची प्रगती कुठे दिसत नाही. वने मात्र बकाल होताना दिसत आहेत.

# गोहत्या बंदी कायद्याचे पालन करावे -डीवायएसपी डॉ. विशाल नेहुल

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

बकरी ईदनिमित्त रसायनी पोलीस ठाण्यात मंगळवार दि.२६ रोजी उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांच्या उपस्थितीत रसायनी पोलीस ठाणे हद्दीतील आपटा व वावेघर मुस्लिम समाजाचे प्रमुख तसेच अखिल आर्यंवत संघ-आंतरराष्ट्रीय बजरंग दल यांच्यात बैठक झाली.या बैठकीत उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ विशाल नेहुल यांनी मार्गदर्शन करतांना गोहत्या बंदी कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले.

इस्लाम धर्मातील परंपरेनुसार, पैगंबर इब्राहिम यांनी अल्लाहच्या आदेशाप्रती निष्ठा आणि समर्पण दर्शवित आपल्या प्रिय गोष्टीचा त्याग करण्याची तयारी दाखवली. त्याच स्मरणार्थ "कुर्बानी"ची परंपरा आजही पाळली जाते.परंतू महाराष्ट्रात गोहत्या बंदीचा कायदा लागू आहे.गाईला राज्यमाता हा दर्जा देण्यात आला आहे.तरी गाय,बैल,वासरु यांची कत्तल झाल्याचे समजल्यास पोलिस



प्रशासनाकडून कडक कारवाई होईल असे उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ विशाल नेहुल यांनी सांगितले

यावेळी आंतरराष्ट्रीय बजरंग दलाच्या प्रसिध्दी विभागाचे कोकण प्रांत अध्यक्ष राकेश खराडे यांनी सांगितले की, बजरंग दलाचे कार्यकर्ते राज्यासह कोकण विभागात संरक्षणासाठी विविध भागांमध्ये सतर्क राहणार आहेत.यावेळी गोसंरक्षक मलेश गुडसे यांनी आगामी बकरी ईद सणादरम्यान गोहत्या करु नये असे सांगितले.

यावेळी पोलिस उपविभागीय अधिकारी डॉ विशाल नेहुल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ, आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे कोकण प्रांत प्रसिध्दी प्रमुख विभाग अध्यक्ष राकेश खराडे, खालापूर तालुका अध्यक्ष प्रशांत तांबोळी, सतीश महाडिक, विधानसभा गोरक्षा प्रमुख मलेश गुडसे, दिनेश पडवल,कायदे सल्लागार प्रमोद मैदर्गीकर,चौक विभाग अध्यक्ष सचिन साळवी,भोकरपाडा विभाग अध्यक्ष श्री सुर्वे व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# रोह्यातील कुंडलिका नदीकाठच्या गावांमध्ये पाणीटंचाई

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात मुबलक पाणीसाठा असतानाही नियोजनाच्या अभावामुळे रोहा तालुक्यात यावर्षी उन्हाळ्यात पाणीटंचाई भासत असल्याचे दिसून येत आहे. विशेषता बारमाही वाहणाऱ्या कुंडलिका नदी किनारी असलेल्या गावांना पाण्याची समस्या भेडसावत आहे. रोहा तालुक्यात असंख्य पाणी पुरवठा योजना झाल्या. या योजनेचे फलित फक्त कागदावरच असल्याचे पाणीटंचाई वरून दिसून येते. रोहा तालुक्यात प्रत्यक्षात सध्या १५ गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे.

रोहा पंचायत समितीकडील अहवालानुसार रोहा तालुक्यातील न्हावे, नवखार, सोनखार या गावांना पाणी समस्या असल्याचे दिसून येते त्यामुळे या गावांना शासनाकडून टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तर दुसरीकडे औद्योगिकरण झाल्यामुळे



कुंडलिका नदी पूर्णपणे दूषित झाल्याने या नदीच्या काठावरील गावांना एमआयडीसी मार्फत पाणीपुरवठा करण्यासाठी २६ गाव योजना करण्यात आली. या योजनेत मार्फत सुरुवातीला पाणी चालू करण्यात आले. परंतु मोजकेच वर्ष सोडल्यास त्यानंतर या योजनेअंतर्गत येत असलेल्या गावांना सातत्याने उन्हाळ्यात पाणीटंचाई भासत आहे.

याही वर्षी या योजनेअंतर्गत येत असलेल्या पश्चिम खोऱ्यातील भातसई, झोळांबे, लक्ष्मीनगर, डोंगरी, शेणवई, शेणवई आदिवासीवाडी, वावेखार, वावे पोटगे, सानेगाव, धोंडखार, करंजवीरा, महाळुंगे या गावांना पाणी समस्या भेडसावत असल्याने या गावांना एमआयडीसी मार्फत टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.या व्यतिरिक्त काही गावांमध्ये पाणीटंचाई आहे. परंतु पूर्वीपासून असलेल्या नैसर्गिक क्षेत्रामुळे त्या गावांना पाणीटंचाईची झळ पोहचत नाही.

रोहा तालुक्यात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. त्यामुळे पावसाळ्यात मुबलक पाणी साठा निर्माण होत असताना हा पाणीसाठा साठवणूक करण्याची कोणतेही उपाययोजना रोहा तालुक्यात नसल्याने हे पाणी थेट समुद्राला जाऊन मिळते. दुसरीकडे बारमाही कुंडलिका नदी वाहत असते. परंतु या पाण्याचा उपयोग नागरिकांना करता येत नाही. महत्त्वाचे म्हणजे रोहा तालुक्यात उदंड पाणीपुरवठा योजना झाल्या आहेत. पण त्या कागदोपत्री यशस्वी झाल्याचे या पाणीटंचाईमुळे दिसून येते.

*भातसईसह पश्चिम खोऱ्यातील गावांना पाण्याची समस्या भेडसावत आहे. महिलांना या पाणीटंचाईचा त्रास सहन करावा लागतो.सध्या टँकरने पाणीपुरवठा चालू आहे. गेली कित्येक वर्ष या गावांना टँकरनेच पाणीपुरवठा सुरू आहे. रोहा तालुक्यातील पश्चिम खोऱ्यातील नागरिकांनी पाणीटंचाईचा त्रास अजून किती वर्ष सहन करायचा हा माझा प्रश्न आहे.*

**-गणेश खरीवले,** *माजी सरपंच ग्रुप ग्रामपंचायत भातसई*

# गोरेगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला वैद्यकीय उपकरणांचे वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे समाजउपयोगी कार्य अत्यंत स्तुत्य व वाखण्याजोगे असून प्रतिष्ठानचे कार्य उत्तरोत्तर वाढत रहावे असे प्रतिपादन माणगाव तहसील कार्यालयाचे विपीन लोकरे यांनी गोरेगाव येथे कार्यक्रमात बोलताना व्यक्त केला .

डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा,ता.अलिबाग,जि.रायगड यांच्या सौजन्याने गोरेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रास वैद्यकीय उपकरणांचे वाटप कार्यक्रम बुधवार दि.२६ मे रोजी सकाळी १० वा.श्रीमती रुक्मिणिबेन नथुराम शेठ मंगल कार्यालय,गोरेगाव याठिकाणी आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास माणगाव तहसीलदार विपीन लोकरे,गोरेगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नरेंद्र बेलदार,गोरेगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ.विनोद गोरेगावकर,हॉलचे मालक भूपेंद्र शेठ,लोकशाही चॅनलचे रायगड जिल्हा प्रतिनिधी भारत गोरेगावकर,आरोग्य पर्यवेक्षक आर.आर.पाटील आदी मान्यवरांसह गोरेगाव विभागातील तसेच माणगाव तालुक्यातील श्री सदस्य बंधू - भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना तहसीलदार विपीन लोकरे यांनी प्रतिष्ठानतर्फे वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात हे कार्य निश्चितच कौतुकास्पद असल्याचे सांगुन शासनातर्फे राबविण्यात येणारा जनगणना कार्यक्रमास सर्वानी सहकार्य करावे ,आयुष्यमान कार्ड देखील सर्वानी काढून घेण्याचे सूचित केले. गोरेगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नरेंद्र बेलदार यांनी प्रतिष्ठानला मनापासून शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमात गोरेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रास मान्यवरांच्याहस्ते डॉ.विनोद गोरेगावकर व त्यांचे सहकारी यांच्याकडे स्टील स्प्रेअरवेल कपाट,रक्तदाब मोजण्याचे यंत्र,शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणारे चिमटे,वैद्यकीय साहित्य निर्जंतुक ठेवण्याचे डबे,प्रसूती दरम्यान वापरण्यात येणाऱ्या कात्र्या,प्रिंटरसहित कम्प्युटर, वॉटर कुलर,ऑक्सिजन प्रवाह मोजण्याचे यंत्र,व्हील चेअर ,ऑपरेशन थिएटर टेबल,जखमेवरील टाके काढण्याचे व घालण्याचे स्टेपलर अशी रुग्णालयात लागणारी विविध वैद्यकीय उपकरणे सुपूर्द करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री सदस्या शालिनी शिर्के यांनी केले.



# उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांचा गुणगौरव

**मुरुड : प्रतिनिधी**

महावितरण मधील विविध पदावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या वायरमन,लिपिक,वीज तांत्रिक,कनिष्ठ अभियंता आदी सर्व घटकातील कर्मचारी वृंद यांनी निभावलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांचा सत्कार समारंभ नुकताच निसर्ग फॉर्म हौस आंबोली येथे आयोजित करण्यात आला होता.यावेळी सर्व बक्षीसपात्र कर्मचारी यांना मुरुड महावितरणचे उपकार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी यांच्या हस्ते प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरवण्यात आले.



मुरुड उपविभागातील महावितरण विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मार्च २०२६ या महिन्यात केलेल्या उत्कृष्ट आणि उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत एका विशेष गुणगौरव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा सोहळा कार्यकारी अभियंता आणि अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि अध्यक्षतेखाली अत्यंत उत्साहात पार पडला.

मार्च महिना हा आर्थिक वर्षाचा शेवटचा महिना असल्याने महावितरणच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि आव्हानात्मक असतो. या काळात सर्व कर्मचाऱ्यांनी चिकाटीने आणि कठोर परिश्रम घेऊन दिलेली उद्दिष्टे यशस्वीपणे पूर्ण करत असतात. कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक करण्यासाठी आणि त्यांचा उत्साह वाढवण्यासाठी या गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात येत असते .सर्व कर्मचारी वृंद यांना ट्रॉफी आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला.

या सोहळ्याचे आणखी एक मुख्य आकर्षण म्हणजे उपकार्यकारी अभियंता यांच्यातर्फे सर्व सन्मानित कर्मचाऱ्यांना महावितरणचा अधिकृत लोगो (Logo) असलेले एक विशेष गिफ्ट (भेटवस्तू) देण्यात आले. कंपनीप्रती असलेली निष्ठा आणि अभिमान अधिक दृढ व्हावा, या उद्देशाने हे गिफ्ट देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता- श्रवनकुमार वेमूला उपकार्यकारी अभियंता कृष्णात सूर्यवंशी कनिष्ठ अभियंता मनोज देशमुख,सतीश खरात, संदेश होंडे, कासीम शेख, सचिन पवार सहाय्यक अभियंता परमानंद बैकर, दिनेश ढाळे सहाय्यक लेखापाल विनायक ताजवेप्रधान तंत्रज्ञ विजय राठोड , गौरी राठोड आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माणगावच्या नगरसेविका ममता थोरे यांचे वॉर्डातील समस्यांबाबत मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायतीतील वॉर्ड क्र. ४ मधील विविध समस्या व प्रश्नांबाबत वॉर्डाच्या नगरसेविका ममता थोरे यांनी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी यांना निवेदन देऊन त्यांचे या कामांबाबत लक्ष वेधून सदरील प्रश्न,समस्या लवकरातलवकर मार्गी लागावे अशी विनंती केली असून अन्यथा या समस्यांबाबत नागरिकांच्यावतीने लोकशाही मार्गाने आंदोलन छेडले जाईल, असा इशारा नगरसेविका थोरे यांनी दिला आहे.

मुख्याधिकारी संतोष माळी यांना दिलेल्या निवेदनात नगरसेविका ममता थोरे यांनी असे म्हटले आहे कि,माझ्या वॉर्डातील गंभीर वीज समस्या, लाईटमन अभाव व प्रशासनाच्या निष्काळजीपणाबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. माझ्या वॉर्डात गेल्या अनेक दिवसांपासून वीज पुरवठा व स्ट्रीट लाईट संदर्भातील गंभीर



समस्या निर्माण झालेल्या आहेत. वारंवार तक्रारी व पाठपुरावा करूनही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. परिस्थिती इतकी गंभीर व लाजिरवाणी झाली आहे की माझ्या वॉर्डातील एका सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक यांच्या अंत्यविधीसाठी अक्षरशः गाडीच्या लाईटचा आधार घ्यावा लागला. ही बाब प्रशासनासाठी अत्यंत दुर्दैवी, लाजिरवाणी आणि संतापजनक आहे.

एकीकडे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी कार्यालयाकडे पुरेसे कर्मचारी नसल्याचे कारण दिले जाते,तर दुसरीकडे नगरपंचायत हद्दीत एकच वायरमन कार्यरत आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून संपूर्ण प्रभाग अंधारात ढकलला जात आहे. तरी आपण या प्रकरणाची तात्काळ गंभीर दखल घेऊन नगर पंचायतमध्ये तातडीने वायरमन नियुक्त करण्यात यावेत. वॉर्डातील सर्व बंद स्ट्रीट लाईट व वीज समस्या त्वरित मार्गी लावण्यात याव्यात. संबंधित निष्काळजी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी. अन्यथा नागरिकांच्या वतीने तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याशिवाय पर्याय उरणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

# नानामास्तर नगरमधील उद्यान सौर दिव्यांनी उजळणार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगरपरिषद हद्दीतील नानामास्तर नगर मधील सुवर्ण जयंती उद्यानात सौर दिव्यांचा उंच खांब उभारण्यात आला असून आता हे उद्यान सौर दिव्यांनी उजळणार आहे. कर्जतमध्ये नेहमीच वीज खंडित होत असते. त्यामुळे सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरते. त्यामुळे नगरपरिषदेने शहरातील प्रमुख ठिकाणी सौर दिव्यांचे तीस फूट उंच खांब उभारले आहेत. नानामास्तर नगर मधील उद्यानात सुद्धा सौर दिव्यांचा खांब उद्यानाच्या मधोमध उभारला आहे. त्यामुळे आता वीज गेली तरी उद्यान प्रकाशित राहणार आहे.

या उद्यानात नानामास्तर नगर परिसरातील असंख्य मुले खेळण्यासाठी येत असतात तसेच मॉर्निंग वॉकसाठी नागरिक येतात. त्यामुळे आता त्यांना सौर ऊर्जेने प्रकाशमय होणाऱ्या उद्यानामध्ये येण्यास अडचण येणार नाही.

अखिल भारतीय बुद्धिबळ मास्टर स्पर्धा

# अव्वल मानांकित खेळाडूंची आगेकूच



**मुंबई : प्रतिनिधी**

अव्वल मानांकित खेळाडूंनी सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर अखिल भारतीय बुद्धिबळ मास्टर स्पर्धेच्या चौथ्या सत्रात विजयी मालिका कायम राखली. पेडर रोड येथील रशियन सेंटर फॉर सायन्स अँड कल्चरमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत अनेक रोमांचक लढती रंगल्या.

अव्वल मानांकित श्रेयांश सोमय्या (१९७३) याने निखिल जोशी (१६४५) याचा पराभव करीत आपली अपराजित मालिका कायम ठेवली. रेयांश व्यंकट (१९०६) याने संयुक्त आघाडीमधील स्थान कायम राखताना समर्थ पाटकर (१६२४) याचा पराभव केला. आणखी एका महत्त्वाच्या सामन्यात कुश अग्रवाल (१८३५) याने भारद्वाज सक्षम (१५९४) याच्यावर शानदार विजय मिळवला. एजीएम राजवीर पिंकेश नहार (१८०१) याने दीपक जाधव आदित्य (१५८८) याचा पराभव करीत विजेतेपदाच्या शर्यतीत आपले स्थान भक्कम केले.

अत्यंत चुरशीच्या रंगलेल्या लढतीत जान्हवी सोनेजी (१७९२) आणि आशिष जैन त्वेशा (१५७६) यांनी बरोबरी मान्य केली. तसेच, मयूरेश पारकर (१७८१) याने निहाल भोसले (१५८०) याला नमवून आपली दमदार कामगिरी कायम राखली. ओम देवरूखकर (१७२६) याने स्पर्धेत 'जायंट किलर' ठरलेल्या सोहम सहमते (१५४०) याचा अटीतटीच्या सामन्यात पराभव केला.

# मी पळ काढणाऱ्यातला नाही -रहाणे

**कोलकाता : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेच्या इतिहासातील तीन वेळचा चॅम्पियन कोलकाता नाईट रायडर्सचा संघाला अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखालील पुन्हा एकदा साखळी फेरीतीच गाशा गुंडाळण्याची वेळ आली. अजिंक्यने टीम इंडियाचेही नेतृत्व केले आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील अपराजित कॅप्टन असा विक्रम त्याच्या नावे आहे, पण आयपीएलमध्ये त्याला नेतृत्वातील कर्तृत्व सिद्ध करता आले नाही. केकेआरच्या खराब कामगिरीनंतर कॅप्टन्सीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना रहाणेने यंदाच्या हंगामात संघाचा प्रवास आणि आपल्या कॅप्टन्सीसंदर्भात मोठे भाष्य केले आहे.

कोलकाता नाईट रायडर्सचा कर्णधार अजिंक्य रहाणेने सांगितले की, आयपीएल २०२६ स्पर्धेत संघाची सुरुवात खराब झाली असली तरी त्याच्या मनात कधीही कर्णधारपद सोडण्याचा विचार आला नाही. संघ अडचणीत असताना मजबूतपणे उभे राहणे महत्त्वाचे असल्याचेही रहाणेने स्पष्ट केले. संघाने पहिल्या सहा सामन्यांपैकी



पाच सामने गमावले होते, मात्र त्यानंतर केकेआरने शानदार पुनरागमन करत पुढील आठपैकी सहा सामने जिंकले आणि प्लेऑफच्या शर्यतीत रंगत कायम ठेवली.

कोलकाता संघाला ईडन गार्डन्सच्या ऐतिहासिक मैदानात झालेल्या साखळी फेरीतील अखेरच्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने ४० धावांनी पराभूत केले. या सामन्यानंतर पत्रकार परिदेषदेत बोलताना अजिंक्य रहाणे म्हणाला की, मी आयुष्यभर चांगल्या वृत्तीने क्रिकेट खेळलो आहे. मी पळ काढणाऱ्यातला नाही. जेव्हा संघ संघर्ष करत असतो त्यावेळी खंबीरपणे उभे राहणे गरजेचे असते. दडपण होते, पण त्याचा अधिक विचार न करता संघाला पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला, असे सांगत त्याने कॅप्टन्सी सोडण्याचा विचार मनात येण्याचा प्रश्नच नाही, असे बोलून दाखवले.

### लोकल लीगमध्ये खेळण्यासाठी उत्सुक

कोलकाता नाईट रायडर्सचा प्रवास संपुष्टात आल्यावर अजिंक्य रहाणे याने मुंबई टी-२० लीगमध्ये खेळण्यास उत्सुक असल्याचे बोलून दाखवले. आयपीएल फ्रँचायझी संघाच्या पुढील योजनेसंदर्भात कॉल किंवा झूमच्या माध्यमातून आम्ही पुन्हा एकत्रित येऊ. सध्याच्या घडीला दोन दिवसांच्या ब्रेकनंतर लोकल क्रिकेटच्या माध्यमातून पुन्हा क्रिकेटचा आनंद घेण्यासाठी मैदानात उतरेन, असे तो म्हणाला. मुंबई स्थानिक टी-२० लीगमध्ये अजिंक्य रहाणे हा नॉर्थ मुंबई पँथर्स संघाचा आयकॉन आहे.

# हरमनप्रीत कौरला 'पद्मश्री' प्रदान

## बीसीसीआय, मुंबई इंडियन्सकडून खास कौतुक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सोमवारी राष्ट्रपती भवनाच्या प्रजासत्ताक मंडपात २०२६ सालचे पहिले टप्प्यातील पद्म पुरस्कार प्रदान केले. पहिल्या टप्प्यात ६६ मान्यवरांचा सन्मान करण्यात आला, तर उर्वरित विजेत्यांना दुसऱ्या टप्प्यात पुरस्कार प्रदान केले जातील. यातच भारतीय महिला क्रिकेट संघाची आणि मुंबई इंडियन्सच्या महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिला राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

बीसीसीआयने व्हिडीओ पोस्ट करत हरमनप्रीतचे अभिनंदन केले. "खऱ्या चॅम्पियन खेळाडूचा यथोचित सन्मान झाला," असे बीसीसीआयने लिहिले, तर "संपूर्ण भारताला तुझा अभिमान आहे," अशा शब्दांत मुंबई इंडियन्सने तिचे कौतुक केले.



### अशी आहे आंतरराष्ट्रीय कारकीर्द

हरमनप्रीतने सात कसोटी, १६४ एकदिवसीय आणि १९५ टी-२० सामने खेळले आहेत. तिने कसोटीत २३०, एकदिवसीय सामन्यांमध्ये ४५४१ आणि टी-२० सामन्यांत ३९९१ धावा केल्या आहेत. तिच्या नावावर कसोटीत एक अर्धशतक, वनडेत सात शतके आणि २४ अर्धशतके, तर टी-२० सामन्यांमध्ये एक शतक आणि १६ अर्धशतके आहेत.

# हार्दिकच्या नेतृत्वावर प्रशिक्षक पोलार्डचे प्रश्नचिन्ह

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६ हा हंगाम मुंबई इंडियन्स संघासाठी अत्यंत निराशाजनक ठरला. गुणतालिकेत थेट नवव्या स्थानावर फेकल्या गेलेल्या मुंबईच्या या कामगिरीनंतर आता कर्णधार हार्दिक पांड्याच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. २०२५च्या मोसमात तिसऱ्या स्थानावर असलेल्या मुंबईची यंदाची पीछेहाट चाहत्यांच्या आणि व्यवस्थापनाच्या पचनी पडलेली नाही. या पार्श्वभूमीवर मुंबई इंडियन्सचा फलंदाजी प्रशिक्षक किएरॉन पोलार्डने संघाच्या कामगिरीवर आणि हार्दिकच्या नेतृत्वावर रोकठोक भाष्य केले आहे.

यंदाच्या हंगामातील अखेरच्या सामन्यात राजस्थान रॉयल्सकडून मुंबईला पराभव पत्करावा लागला. यानंतर पत्रकार परिषदेत



पोलार्ड म्हणाला की, हार्दिकला संघातून सर्वोत्तम कामगिरी करून घेण्यात अपयश आलेच, शिवाय वैयक्तिक पातळीवर फलंदाजी आणि गोलंदाजीतही तो सपशेल फ्लॉप ठरला.

हार्दिकच्या नेतृत्वाबद्दल बोलताना पोलार्ड म्हणाला, "एक कर्णधार म्हणून हार्दिकला अपेक्षित कामगिरी करता आली नाही हे उघड आहे. मॅनेजमेंट म्हणून आम्हालाही अपेक्षित असलेला निकाल मिळाला नाही, पण एक गोष्ट मी नक्की सांगेन की, त्याला संघाचे नेतृत्व करण्यासाठी आणि सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आणि प्रत्येक संधी दिली. हा केवळ एकाचा नाही, तर संपूर्ण मुंबई इंडियन्स संघाचा सामूहिक पराभव असल्याचे पोलार्डने स्पष्ट केले.

"इथे बसून कोणीही एकमेकांवर बोट दाखवणार नाही. जेव्हा तुम्ही हरता, तेव्हा संपूर्ण संघाचा विचार करावा लागतो. खेळात जय-पराजयाचा सामना करावाच लागतो, त्यामुळे मी काही गोष्टींवर प्रश्न उपस्थित करणार नाही. हार्दिकने प्रामाणिक प्रयत्न केले, आम्ही सर्वांनी प्रयत्न केले, पण यश मिळाले नाही. आता आम्ही एकत्र बसून काय सर्वोत्तम आहे यावर चर्चा करू. पुढील १२ महिन्यांत आम्ही नक्कीच जोरदार पुनरागमन करू," असा विश्वास त्याने व्यक्त केला.

अखेरच्या सामन्यात स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराहला विश्रांती देण्याच्या निर्णयाचे पोलार्डने समर्थन केले. तो म्हणाला, जसप्रीत हा भारतीय क्रिकेटची अमूल्य संपत्ती आहे. आजचा सामना जिंकून आम्हाला केवळ दोन गुण मिळाले असते, पण त्याने आमच्या अंतिम स्थानावर फारसा फरक पडला नसता. काहीवेळा खेळाडूची परिस्थिती समजून घ्यावी लागते. आमच्याकडे बेंच स्ट्रेंथ आहे आणि आम्ही तरुण खेळाडूंना संधी देत आहोत. त्यामुळे हा एक स्मार्ट निर्णय होता.

### तत्काळ बदलांची घाई नाही

पुढील हंगामात मुंबई इंडियन्सच्या संघात मोठे बदल संकेत पोलार्डने दिले, परंतु कोणताही घाईगडबडीत निर्णय घेतला जाणार नसल्याचे स्पष्ट केले. सीनियर खेळाडूंच्या भविष्याबद्दल विचारले असता तो म्हणाला, सध्या यावर बोलण्याची ही योग्य वेळ नाही. अशा वेळी घेतलेले निर्णय हे भावनेच्या भरात घेतले जाऊ शकतात. प्रत्येकाला थोडा वेळ आणि स्पेस मिळणे गरजेचे आहे, जेणेकरून कुठे चुका झाल्या याचे शांत डोक्याने विश्लेषण करता येईल. जबाबदार व्यवस्थापन म्हणून आम्ही घाईत कोणतेही विधान करणार नाही.

# अर्शदीपने इन्स्टाग्राम अकाउंटवरील २००हून अधिक पोस्ट केल्या डिलीट



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. अर्शदीपने अचानक आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवरील २००हून अधिक पोस्ट डिलीट केल्याने चाहत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, त्याने आपला प्रोफाइल फोटोही बदलला आहे.

यामुळे सोशल मीडियावर विविध चर्चा रंगू लागल्या आहेत. अनेक चाहत्यांनी हे 'पर्सनल रिसेट', सोशल मीडिया क्लीनअप किंवा नव्या इमेजसाठी 'रीब्रँडिंग' असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे, मात्र अर्शदीपने याबाबत अद्याप कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण दिलेले नाही.

अर्शदीपने डिलीट केलेल्या पोस्टमध्ये विराट कोहली सोबतचा व्हायरल व्हिडिओही आहे. २०२५च्या चॅम्पियन्स ट्रॉफीदरम्यानचा हा व्हिडीओ तब्बल १५० मिलियनपेक्षा अधिक व्ह्यूज मिळवून प्रचंड व्हायरल झाला होता, मात्र आता हा व्हिडीओ त्याच्या अकाउंटवर दिसत नाही.

# युवराज सिंगकडून तीन खेळाडूंबद्दल टिपण्णी

**चंदिगड : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६च्या प्लेऑफच्या टीम ठरल्या असल्या, तरी याचदरम्यान भारताचा माजी क्रिकेटपटू युवराज सिंग एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आला आहे. सोशल मीडियावर युवराजने आयपीएलमधील तीन खेळाडूंवर मजेशीर शैलीत नाराजी व्यक्त करत "तुम्हा सगळ्यांना चप्पल मारायची वेळ आली आहे" अशी टिप्पणी केली.

युवराज सिंगने ज्या तीन खेळाडूंवर ही प्रतिक्रिया दिली, त्यामध्ये प्रियांश आर्य, अर्शदीप सिंग आणि हरप्रीत ब्रार यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, हे तिन्ही खेळाडू आयपीएल



२०२६मध्ये पंजाब किंग्स संघाकडून खेळले होते आणि त्यांचा संघ यंदाही प्लेऑफमध्ये पोहचू शकला नाही.

हरप्रीत ब्रारने सोशल मीडियावर एक फोटो पोस्ट केला होता. या फोटोमध्ये प्रियांश आर्या आणि अर्शदीप सिंगदेखील दिसत होते. हरप्रीतने मजेशीर अंदाजात प्रियांशला "स्लॉगर" तर अर्शदीपला "ब्लॉगर" असे संबोधले.

यावर युवराज सिंगने कमेंट करत लिहिले, "तुम्हा सगळ्यांना चप्पल मारायची वेळ आली आहे." युवराजची ही कमेंट विनोदी स्वरूपात असल्याचे चाहत्यांकडून मानले जात असून सोशल मीडियावर ती चांगलीच व्हायरल झाली आहे.

यंदाच्या हंगामात प्रियांश आर्याची कामगिरी तुलनेने चांगली राहिली. त्याने १३ सामन्यांत २११पेक्षा अधिक स्ट्राइक रेटने ३६४ धावा केल्या. दुसरीकडे अर्शदीप सिंगने १४ सामन्यांत १४ विकेट घेतल्या, मात्र त्याची इकॉनॉमी आणि सरासरी अपेक्षेइतकी चांगली नव्हती. हरप्रीत ब्रारला फारशी संधी मिळाली नाही. त्याने फक्त दोन सामने खेळत दोन विकेट घेतल्या. दरम्यान, युवराजची ही कमेंट चाहत्यांमध्ये चर्चेचा विषय ठरलीय.

# टी-२० क्रिकेटमध्ये द्विशतक झळकावण्याचे वैभवचे स्वप्न



**मुंबई : प्रतिनिधी**

वैभव सूर्यवंशी आयपीएलमधील प्रत्येक सामन्यात एकामागून एक विक्रम आपल्या नावे करत आहे. त्याने फार कमी वयात आपल्या कौशल्याच्या जोरावर क्रिकेट जगतात आपले नाव कमावले आहे. आता आयपीएलमध्ये वैभव हा ख्रिस गेलचा सर्वात मोठ्या धावसंख्येचा विक्रम मोडणार का, असा प्रश्न सर्वांनाच पडला आहे. यादरम्यान पीटरसनबरोबरच्या एका शोमध्ये वैभवने टी-२०मधील आपले मोठे स्वप्न कोणते आहे हे सांगितले.

वैभव सूर्यवंशी अवघा १५ वर्षांचा असला, तरी राजस्थान रॉयल्सचा हा युवा फलंदाज मोठी स्वप्न पाहत आहे. बहुतांश युवा फलंदाज अर्धशतक किंवा शतक झळकावण्याचे स्वप्न पाहतात, पण वैभवचे लक्ष्य त्याहून खूप मोठे आहे. टी-२० क्रिकेटमध्ये द्विशतक झळकावणारा पहिला फलंदाज बनण्याचे त्याचे स्वप्न आहे. इंग्लंडचा माजी कर्णधार केविन पीटरसनसोबत त्याच्या यूट्यूब चॅनेलवरील संवादात वैभवने ही इच्छा व्यक्त केली. त्याच्या या वक्तव्यामुळे त्याच्याकडे पुन्हा सगळ्यांचे लक्ष वेधले गेले.

वैभव तुला अर्धशतकी खेळी झाल्यानंतर सेलिब्रेशन करायला आवडते का यावर त्याने, "नाही, तितकेसे नाही," असे हसत उत्तर दिले. यानंतर चर्चा त्याच्या महत्त्वाकांक्षेकडे वळली आणि वैभवने स्पष्ट केले की, पारंपरिक विक्रम किंवा टप्पे त्याला फारसे आकर्षित करत नाहीत. "मला टी-२० क्रिकेटमध्ये २०० धावा करायच्या आहेत. मला त्यांचा विक्रम मोडून २०० धावा करायच्या आहेत," असे वैभव म्हणाला. तो ख्रिस गेलच्या ऐतिहासिक विक्रमाबद्दल बोलत होता.

आयपीएल २०१३मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून खेळताना पुणे वॉरियर्स इंडियाविरुद्ध ख्रिस गेलने केलेल्या नाबाद १७५ धावा आजही टी-२० क्रिकेटमधील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या आहे. दशकाहून अधिक काळ लोटल्यानंतरही व्यावसायिक टी-२० क्रिकेटमध्ये अद्याप कोणालाही २०० धावांचा टप्पा गाठता आलेला नाही. बहुतांश खेळाडूंसाठी असे लक्ष्य अवास्तव किंवा खूप धाडसी वाटू शकते, मात्र वैभव सूर्यवंशीसाठी हा आत्मविश्वास अगदी नैसर्गिक असल्याचे दिसून येते.

पीटरसनशी बोलताना ही २०० धावांची खेळी तो कधी साकारणार हेही त्याने सांगितले, "मी कोणत्याही सामन्यात पूर्ण २० षटके फलंदाजी केली, तर १७५ धावांचा तो विक्रम मोडू शकतो," असे तो आत्मविश्वासाने म्हणाला.

# फ्रेंच ओपन २०२६ : निशेष बसवरेड्डीला वाइल्ड कार्ड एण्ट्री



**पॅरिस : वृत्तसंस्था**

फ्रेंच ओपन २०२६ स्पर्धेसाठी भारतीय वंशाचा अमेरिकन टेनिसपटू निशेष बसवरेड्डी याला वाइल्ड कार्ड एण्ट्री मिळाली आहे. आयोजकांनी याची अधिकृत घोषणा केली.

निशेष बसवरेड्डीसोबत तीन वेळा ग्रँडस्लॅम विजेता स्टॅन वावरिंका आणि फ्रान्सचा स्टार खेळाडू गेल मॉनफिल्स यांनाही थेट मुख्य फेरीत स्थान देण्यात आले आहे. वावरिंका आणि मॉनफिल्स हे दोघेही आपल्या करियरच्या अखेरच्या टप्प्यात आहे, हा त्यांचा शेवटचा फ्रेंच ओपन ठरण्याची शक्यता मानली जात आहे. ४१ वर्षीय वावरिंका आणि ३९ वर्षीय मॉनफिल्स या दोघेही या स्पर्धेनंतर व्यावसायिक टेनिसमधून निवृत्ती घेऊ शकतात.

स्वित्झर्लंडच्या वावरिंकाने २०१५मध्ये नोव्हाक जोकोविचला अंतिम फेरीत हरवले होते, तर रोलाँ गॅरोचे विजेतेपद पटकावले होते. सध्या तो एटीपी क्रमवारीत १२५व्या स्थानावर आहे, तर फ्रान्सच्या गेल मॉनफिल्सने २००८मध्ये फ्रेंच ओपनच्या उपांत्य फेरीत धडक मारली होती. आयोजकांकडून या दोन्ही दिग्गजांचा विशेष सत्कारही करण्यात येणार आहे.

२१ वर्षीय निशेष बसवरेड्डीचे पालक मूळचे आंध्र प्रदेशातील नेल्लोरचा आहे. त्याचे वडील मुरलीकृष्ण बसवरेड्डी आणि आई साई प्रसन्ना १९९९मध्ये अमेरिकेत स्थायिक झाले होते. निशेषने यावर्षी ऑस्ट्रेलियन ओपनच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश करत सर्वांचे लक्ष वेधले होते.

# पाच दिग्गजांना आयपीएल ट्रॉफीची हुलकावणी

**मुंबई : प्रतिनिधी**

क्रिकेट विश्वातील मोठे नाव, अफाट फॅन फॉलोइंग आणि अनेक मोठे विक्रम असे भारताचे पाच असे दिग्गज क्रिकेटपटू आहेत, ज्यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट गाजवले, पण आयपीएलमध्ये मात्र त्यांना कधीही विजेतेपदाचा आनंद घेता आला नाही.

यष्टीरक्षक-फलंदाज केएल राहुल इंडियन प्रीमियर लीगमधून पुन्हा एकदा रिकाम्या हाताने परतला. तो २०१३पासून आयपीएलमध्ये खेळत आहे, पण त्याला कधीही ट्रॉफी जिंकता आलेली नाही. दिल्ली संघाकडून खेळण्यापूर्वी तो लखनऊ सुपर जायंट्स, पंजाब किंग्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद या संघांकडून खेळला आहे. आयपीएल २०२६मध्ये राहुलने चांगली कामगिरी केली. तो दिल्ली कॅपिटल्स संघाचा सर्वाधिक धावा (१४ सामन्यांमध्ये ५९३ धावा) करणारा खेळाडू होता.

माजी महान फलंदाज राहुल



द्रविडलाही आयपीएलचे विजेतेपद जिंकता आले नाही. त्याने राजस्थान रॉयल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या दोन्ही संघांचे प्रतिनिधित्व केले आणि दोन्ही संघांचे कर्णधारपदही भूषवले. तो शेवटचा २०१३मध्ये आयपीएल खेळला होता. द्रविडने ८९ आयपीएल सामन्यांमध्ये २८.२३च्या सरासरीने दोन हजार १७४ धावा केल्या.

सौरव गांगुली यालाही आयपीएलमध्ये विजेतेपद मिळवता आले नाही. भारताचा माजी कर्णधार २००८ ते २०१२ या कालावधीत आयपीएलमध्ये खेळला. त्याने कोलकाता नाईट रायडर्स आणि पुणे वॉरियर्स इंडियाकडून खेळताना ५९ सामन्यांत १३४९ धावा केल्या. त्याची सरासरी २५.४५ इतकी होती.

आक्रमक फलंदाजीसाठी प्रसिद्ध असलेला वीरेंद्र सेहवागदेखील आयपीएल ट्रॉफीपासून दूर राहिला. २००८ ते २०१५ या कालावधीत त्याने दिल्ली आणि पंजाब संघांचे प्रतिनिधित्व केले. सेहवागने १०४ सामन्यांत २७२८ धावा करत आपल्या आक्रमक शैलीची छाप सोडली. त्याची सरासरी २७.५५ इतकी होती.

माजी वेगवान गोलंदाज झहीर खान यालाही आयपीएलमध्ये विजेतेपदाचा आनंद घेता आला नाही. त्याने मुंबई इंडियन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि दिल्ली संघाकडून खेळताना १०० सामन्यांत १०२ विकेट्स घेतल्या. झहीरने शेवटचा आयपीएल सामना २०१७मध्ये खेळला होता.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com